म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. ११०४
सन १९२३

...ीं वर्णावीं । सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥-एकनाथ.

# आख्यान-रत्न-माला.

पुस्तक दुसरें.



मंदारमाला.

अत्यादरें लोक-कल्याण व्हाया जिला ठेविलें त्र्यंबकानें शिरीं
तीरीं जिच्या संत, झाले, तयांचा अगूर्णांक तो अन्य देशांतरीं
श्रीभारतीच्या महाराष्ट्र-पुत्रां सदा खेळवी, जी निजांकावरी
... तपें जी असे तीच ही माय गोदावरी।

REFBK-0002330

संग्राहक व प्रकाशक
गणेश अनंत सराफ, नांदेड ( निजामस्टेट )
शके १८४५. ] [ किं. आठ आणे.
मुद्रक-द. गो. सडेकर मालक धनंजय प्रेस—खानापूर-बेळगांव.

REFBK-0002330
2330

# दाची गादी.

## सूचनाकर्त्यांस

मालेचें पहिलें पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून निरनिराळ्या विद्वानांचे व मासिक व वर्तमानपत्रकर्त्यांचे त्यावर उत्कृष्ट अभिप्राय येऊं लागले आहेत. तसेंच मालेंत सुधारणा करण्यासंबंधानेंहि कांहीं उपयुक्त सूचना आतांपर्यंत आल्या आहेत, व पुढेंहि येतील असा संभव आहे. या व पुढील सर्व सूचनांसंबंधीं खुलासा दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या म्हणजे मालेच्या सातव्या पुस्तकांत करण्याचें आम्हीं योजिलें आहे. तरी घेतल्या जाणाऱ्या श्रमाबद्दल व दाखविल्या जाणाऱ्या सहानुभूती बद्दल सूचना करणाऱ्यांनीं निराश होऊं नये, अशी त्यांनां साभार व सविनय विनंती आहे. त्याचप्रमाणें ज्यांनीं पहिल्या पुस्तकांतील नजरचुका आमच्या दृष्टिपथांत आणून दिल्या त्यांचे मनःपूर्वक आभार मानून, सुदैवानें सदरहू पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यास त्याप्रमाणें सुधारणा करूं असें त्यांनां तूर्त आश्वासन देऊन ठेवितों.

## कविवर्गास

मालेंतून देण्याकरितां कांहीं हरिदास व कविवर्गाकडून जुनीं नवीं आख्यानें येऊं लागलीं आहेत, ही समाधानाची गोष्ट होय. नवीन आख्यानें गद्यपद्यासह आलीं तरी चालतील, व पाठविणाऱ्यांनीं इच्छा दर्शविल्यास तीं गद्यपद्यासह छापवूं. तरी ज्या ज्या कवींनीं स्वतः आख्यानें तयार केलीं असतील किंवा ज्यांच्या संग्रहीं इतर जुनीं आख्यानें असतील, तीं त्यांनीं आमचेकडे कृपाकरून पाठवावीं म्हणजे सवडीनुसार प्रसिद्ध करण्यास बरें पडेल. आख्यानें पाठविणाऱ्यांचे आभारी आहों.

## कायम ग्राहकांची गैरसोय दूर झाली.

प्रवेश फी भरून झालेल्या व होणाऱ्या ग्राहकांना प्रत्येक खेपेस चार आणे व्ही. पी. खर्च जास्त सोसावा लागतो, तो त्यांना न लागावा म्हणून जुन्या व नव्या कायम ग्राहकांकरितां पुढील सोय करण्यांत आली आहे.

## जुन्या ग्राहकांस

वर्षांतून निघणाऱ्या मालेच्या सहा पुस्तकांची पाऊणपट किंमत सव्वा दोन रुपये होते. त्यांपैकीं पहिल्या दोन पुस्तकांची किं. बारा आणे आपल्या कडून आले आहेत. यापुढें व्ही. पी. चा त्रास नको असेल तर आपण बाकीचा दीड रुपया कृपाकरून मनीआर्डरीनें पाठवावा; अथवा पुढील पुस्तक पाठवितांना तेवढ्याची व्ही. पी. करण्यास सांगावें.

---

ज्यांनीं वर्षांतील सहा पुस्तकांची प्रवेशफीसह ३। रु. वर्गणी भरली आहे, त्यांना हा नियम लागू नाहीं

## नव्या ग्राहकांस.

आपण मालेचे ग्राहक झालां नसाल तर विलंबन न लावतां ३। रु. मनीआर्डरीनें पाठवून मालेला आश्रय द्या. म्हणजे वर्षभर पुनः व्ही. पी. खर्च सोसावा न लागतां पुस्तक प्रसिद्ध होतांच विनखर्चानें आपल्या हातीं पडेल.

## आख्यान-संग्रह.

दुसऱ्या पुस्तकापासून आख्यानाचीं पानें निरनिराळीं देण्याची व्यवस्था करीत आहों त्यायोगानें ज्यांनां वर्ष अखेर अथवा केव्हांहि ज्या त्या कवींचीं आख्यानें एकत्र करण्याची इच्छा असेल त्यांनां तसा 'आख्यान-संग्रह' करण्यास सोयीचें जाणार आहे.

## काय ह्मणावें ?

कित्येकांनीं कायम ग्राहकांत आपलीं नांवें नोंदवून-कित्येकांनीं तर प्रवेश फी देखील देऊन पहिल्या पुस्तकाचा स्वीकार न करितां व्ही. पी. परत केली आहे. त्यांच्याविषयीं कांहीं न लिहिणेंच बरें, असें आम्हास वाटतें.

## मोंगलाईंतील बांधवांस

आपल्या प्रांतांत वाङ्मयाचा दुष्काळ आहे असें आपलें मत आहे काय? तसें असेल तर तें बरोबर नसून-ह्मणजे **वाङमयाचा दुष्काळ** **नसून खराखुरा दुष्काळ वाङमयाभिरुचीचा** आहे; व तो अद्यापहि कायम आहे, हे आपणांस सप्रमाण सांगावयाचें आहे. पंचवीस वर्षापूर्वीं आपल्या प्रांतांताल **औरंगाबाद** येथें निघत असणाऱ्या '**शारदाविलास**' नामक मासिक पुस्तकांत संपादकांनीं आपला अनुभव असा सांगितला आहे कीं, "**निजाम सरकारचे राज्यांत आह्मास वर्गणीदार कमी मिळाले व इंग्रजी मुलखांत जास्त मिळाले...ई.**" हा उतारा देण्याचा हेतू हाच कीं, त्यावेळच्या वस्तुस्थितीच्या पुनरावृत्तीचा अनुभव दुर्दैवानें मालेच्याहि नशिचीं येण्याचा संभव दिसूं लागला आहे. यावरून **पावशतकांत** वाङ्मयाभिरुचीच्या बाबतींतील हें लांछन आपणांकडून धुवून टाकले गेलें नाही. हें कबूल करणें भाग आहे. आंतां तरी हें लांछन काढून टाकावें असें आपणांस वाटत नाहीं काय? आणि जर खरोखर तसें मनापासून वाटत असेल तर अद्यापहि **पावशतक पुरें होण्यास थोडा अवधि आहे.** त्या अवधींत आपण मालेचे **ग्राहक झाला नसाल तर तावडतोब व्हा.** व झाला असाल तर प्रत्येकीं **निदान एक दोन तरी ग्राहक मिळवून द्या**, व मालेला वरील उताऱ्यांतील दुःखोद्गार काढण्याचा यापुढें केव्हांहि प्रसंग येऊं देऊं नका; ही आपणांस नम्र पण आग्रहाची विनंती आहे.

## उशीर कीं लौकर ?

मालेचें दुसरें पुस्तकहि उशीराच हातीं पडत आहे, असें ग्राहकांस वाटत असेल तर, खरें पाहतां तें आमच्या अडचणींच्या मानानें बरेंच लौकर आहे असें आम्हीं म्हणतों. मात्र या गोष्टीचें श्रेय आमच्याकडे नसून तें श्री. **दत्तात्रय गोविंद सडेकर**-सं. **लोकमित्र** व मालक

( टैटल पेज ३ पहा. )

# आख्यान-रत्न-माला.

## मंगलाचरण.

( संतकवि-दासगण. )

पद [ चाल-आनंदाचा कंद. ]

दीनोद्धारा ! परमोदारा !
आनंदकंदा ! माधवा ! ध्रु०

रुक्मिणिरमणा ! हे परिपूर्णा !
तव समचरणा केधवां-
नकळे दाविसि हे हृषिकेसी !
पंढरि वासी केशवा ! १

चाल—श्रुतिःस्मृतिहि त्या कुंठित झाल्या
मौनें तुझिया पायिं लागल्या
भक्ति-सुधेला हे जगपाला !
दासगणूला चाखवा २

# अर्पण.



श्लोक ( मंदाक्रांता )

आर्ये ! माला बुधजनिं तुला अर्पिल्या शारदेला
त्यांची संख्या अमित परि त्यां त्यां दिलें मान्यतेला
तैसा माझा जननि ! लघुसा यत्न हा मान्य व्हावा
सत्कार्यी या निज पद-रता त्वां यशोलाभ द्यावा

## अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | नारदाची गादी. ( प्रकाशकाचें हृद्गत. ) | १—२ |
| २ | मंगलाचरण. ( संतकवि दासगणू. ) | ३ |
| ३ | कविपरिचय. | ४ |
| ४ | सुभद्राहरण ( कविवर्य चूडामणि-सुत ) | १—८ |
| ७ | नारद-माया-दर्शन ( कविवर्य रुक्मांगद-सुत ) | १—४ |
| ५ | कान्होपात्रा ( संतकवि दासगणू ). | १-१६ |
| ६ | पृथ्वीराजबंधन ( श्री. कृष्णाजी गोविंद ताह्मनकर नागपूर.) | १-१६ |



आख्यान-रत्न-माला—वर्षांतून ६ पुस्तकें. पृ० ४८ किं० ८ आणे. १ रु०
प्रवेश फी भ॰णारास पाउणपट किं० एकदम ६ पुस्तकांची किं० प्र० फी सह ३। रु०

REFBK-0002330

# ...दाची गादी.

## सूचनाकर्त्यांस

मालेचें पहिलें पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून निरनिराळ्या विद्वानांचे व मासिक व वर्तमानपत्रकर्त्यांचे त्यावर उत्कृष्ट अभिप्राय येऊं लागले आहेत. तसेंच मालेंत सुधारणा करण्यासंबंधानेंहि कांहीं उपयुक्त सूचना आतांपर्यंत आल्या आहेत, व पुढेंहि येतील असा संभव आहे. या व पुढील सर्व सूचनासंबंधीं खुलासा दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या ह्मणजे मालेच्या सातव्या पुस्तकांत करण्याचें आह्मीं योजिलें आहे. तरी घेतल्या जाणाऱ्या श्रमाबद्दल व दाखविल्या जाणाऱ्या सहानुभूती बद्दल सूचना करणाऱ्यांनीं निराश होऊं नये, अशी त्यांनां साभार व सविनय विनंती आहे. त्याचप्रमाणें ज्यांनीं पहिल्या पुस्तकांतील नजरचुका आमच्या दृष्टिपथांत आणून दिल्या त्यांचे मनःपूर्वक आभार मानून, सुदैवानें सदहू पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यास त्याप्रमाणें सुधारणा करूं असें त्यांनां तूर्त आश्वासन देऊन ठेवितों.

## कविवर्गास

मालेंतून देण्याकरितां कांहीं हरिदास व कविवर्गाकडून जुनीं नवीं आख्यानें येऊं लागलीं आहेत, ही समाधानाची गोष्ट होय. नवीन आख्यानें गद्यपद्यासह आलीं तरी चालतील, व पाठविणाऱ्यांनीं इच्छा दर्शविल्यास तीं गद्यपद्यासह छापवूं. तरी ज्या ज्या कवींनीं स्वतः आख्यानें तयार केलीं असतील किंवा ज्यांच्या संग्रहीं इतर जुनीं आख्यानें असतील, तीं त्यांनीं आमचेकडे रुपाकरून पाठवावीं ह्मणजे सवडीनुसार प्रसिद्ध करण्यास बरें पडेल. आख्यानें पाठविणाऱ्यांचे आभारी आहों.

## कायम ग्राहकांची गैरसोय दूर झाली.

प्रवेश फी भरून झालेल्या व होणाऱ्या ग्राहकांना प्रत्येक खेपेस चार आणे व्ही. पी. खर्च जास्त सोसावा लागतो, तो त्यांना न लागावा ह्मणून जुन्या व नव्या कायम ग्राहकांकरितां पुढील सोय करण्यांत आली आहे.

## जुन्या ग्राहकांस

वर्षांतून निघणाऱ्या मालेच्या सहा पुस्तकांची पाऊणपट किंमत सव्वा दोन रुपये होते. त्यांपैकीं पहिल्या दोन पुस्तकांची किं. बारा आणे आपल्या कडून आले आहेत. यापुढें व्ही. पी. चा त्रास नको असेल तर आपण बाकीचा दीड रुपया रुपाकरून मनीआर्डरीनें पाठवावा; अथवा पुढील पुस्तक पाठवितांना तेवढ्याची व्ही. पी. करण्यास सांगावें.

---

ज्यांनीं वर्षांतील सहा पुस्तकांची प्रवेशफीसह ३। रु. वर्गणी भरली आहे, त्यांना हा नियम लागू नाहीं

## नव्या ग्राहकांस.

आपण मालेचे ग्राहक झालां नसाल तर विलंब न लावतां ३। रु. मनीआर्डरीनें पाठवून मालेला आश्रय द्या. म्हणजे वर्षभर पुनः व्ही. पी. खर्च सोसावा न लागतां पुस्तक प्रसिद्ध होतांच बिनखर्चानें आपल्या हातीं पडेल.

## आख्यान–संग्रह.

दुसऱ्या पुस्तकापासून आख्यानाचीं पानें निरनिराळीं देण्याची व्यवस्था करीत आहों त्यायोगानें ज्यांनां वर्ष अखेर अथवा केव्हांहि ज्या त्या कवींचीं आख्यानें एकत्र करण्याची इच्छा असेल त्यांनां तसा 'आख्यान–संग्रह' करण्यास सोयीचें जाणार आहे.

## काय म्हणावें ?

कित्येकांनीं कायम ग्राहकांत आपलीं नांवें नोंदवून–कित्येकांनीं तर प्रवेश फी देखील देऊन पहिल्या पुस्तकाचा स्वीकार न करितां व्ही. पी. परत केली आहे. त्यांच्याविषयीं कांहीं न लिहिणेंच बरें, असें आम्हास वाटतें.

## मोंगलाईंतील बांधवांस

आपल्या प्रांतांत वाङ्मयाचा दुष्काळ आहे असें आपलें मत आहे काय ? तसें असेल तर तें बरोबर नसून–म्हणजे **वाङमयाचा दुष्काळ नसून खराखुरा दुष्काळ वाङमयाभिरुचीचा** आहे; व तो अद्यापहि कायम आहे, हे आपणांस सप्रमाण सांगावयाचें आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं आपल्या प्रांतांतील **औरंगाबाद** येथें निघत असणाऱ्या '**शारदाविलास**' नामक मासिक पुस्तकांत संपादकांनीं आपला अनुभव असा सांगितला आहे कीं, "**निजाम सरकारचे राज्यांत आह्मास वर्गणीदार कमी मिळाले व इंग्रजी मुलखांत जास्त मिळाले...**ई." हा उतारा देण्याचा हेतू हाच कीं, त्यावेळच्या वस्तुस्थितीच्या पुनरावृत्तीचा अनुभव दुर्दैवानें मालेच्याहि नशिबीं येण्याचा संभव दिसूं लागला आहे. यावरून **पावशतकांत** वाङ्मयाभिरुचीच्या बाबतींतील हें लांछन आपणांकडून धुवून टाकलें गेलें नाहीं. हें कबूल करणें भाग आहे. आतां तरी हें लांछन काढून टाकावें असें आपणांस वाटत नाहीं काय ? आणि जर खरोखर तसें मनापासून वाटत असेल तर अद्यापहि **पावशतक पुरें होण्यास थोडा अवधि आहे**. त्या अवधींत आपण मालेचे **ग्राहक झाला नसाल तर तावडतोब व्हा.** व झाला असाल तर प्रत्येकीं **निदान एक दोन तरी ग्राहक मिळवून द्या,** व मालेला वरील उताऱ्यांतील दुःखोद्गार काढण्याचा यापुढें केव्हांहि प्रसंग येऊं देऊं नका; ही आपणांस नम्र पण आग्रहाची विनंती आहे.

## उशीर कीं लौकर ?

मालेचें दुसरें पुस्तकहि उशीराच हातीं पडत आहे, असें ग्राहकांस वाटत असेल तर, खरें पाहतां तें आमच्या अडचणींच्या मानानें बरेंच लौकर आहे असें आम्ही म्हणतों. मात्र या गोष्टीचें श्रेय आमच्याकडे नसून तें श्री. **दत्तात्रय गोविंद सडेकर**-सं. **लोकमित्र** व मालक

( टैटल पेज ३ पहा. )

# आख्यान-रत्न-माला.

## मंगलाचरण.

( संतकवि-दासगण. )

पद [ चाल-आनंदाचा कंद. ]

दीनोद्धारा ! परमोदारा !
आनंदकंदा ! माधवा ! ध्रु०

रुक्मिणिरमणा ! हे परिपूर्णा !
तव समचरणा केधवां–
नकळे दाविसि हे हृषिकेसी !
पंढरि वासी केशवा ! १

चाल—श्रुतिःस्मृतिहि त्या कुंठित झाल्या
मौनें तुझिया पायिं लागल्या
भक्ति-सुधेला हे जगपाला !
दासगणूला चाखवा २

—:-:-—

# कवि-परिचय.

श्री. कृष्णाजी गोविंद ताम्हणकर—उच्चशिक्षणाच्या अभावींहि अर्वाचीन पिढींत देशाभिमानाची जागती ज्योत व

**सामर्थ्य आहे चळवळींचें जोजो करील तयाचें**
**परी तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे १** दासबोध

या समर्थांच्या सिद्धांतावरील दृढ विश्वास; या दोन गुणानीं युक्त अशा व्यक्ति फारच थोड्या सांपडतील. यांपैकींच नागपूरचे सुप्रसिद्ध कवि श्री. कृष्णाजी गोविंद ताम्हणकर हे एक होत. सध्यांच्या परिस्थितींत भारताचा उद्धार होण्याकरितां, पूर्वी अवनतीच्या काळीं अपल्या पूर्वजांनीं ज्या गुणांचा आश्रय करून आपला उद्धार करून घेतला, तसा प्रत्येक भारतवासियानें अवश्य अशा गुणांचा आश्रय करावा; ही सर्वोत्कृष्ट कल्पना ताम्हणकरांच्या अंतःकरणाशीं एकजीव झाली आहे. यांची कविता नेहमीं याच भावनेनें प्रेरित असते. उपदेशरूपानें भारताचा उद्धार करणें झाल्यास, तो महाराष्ट्रांतील हरिदासांनीं व कीर्तनकारांनींच करावा अशी त्यांची महत्वाकांक्षा आहे; व तिला अनुसरून त्यांनीं 'भारतोद्धार माला' या नांवानें कीर्तनोपयोगी ऐतिहासिक आख्यानें रचून तीं प्रसिद्ध करण्याचा उपक्रम सुरू केला. आर्थिक सुस्थितीच्या अभावींच ह्मणजे प्रतिकूल परिस्थितींतच त्यांनीं त्या मालेचें प्रथम पुष्प प्रसिद्ध करून रसभरित अशीं १० ऐतिहासिक आख्यानें महाराष्ट्रीयांस सादर केलीं आहेत. योग्य उत्तेजनाभावी त्यांचा पुढील प्रयत्न शिथिल होऊं पहात आहे, हें दुर्दैव होय. भारतोद्धार मालेच्या दुसऱ्या पुस्तकाकरितां ह्मणून रचलेल्या आख्यानाचें बाड वरील कारणामुळेंच त्यांनीं आमचेकडे पाठवून मालेला आभारी केलें आहे. राष्ट्रीय गुणांचा परिपोष करतील अशीं त्यांचीं आख्यानें असून कांहीं आख्यानें आमच्या वाचकांकरितां आह्मीं मालेंत देण्याचें योजिलें आहे. याशिवाय 'स्वराज्यगीता' सारखी बरीच स्फुटकवितांहि त्यांनीं लिहिली आहे. त्यांची व्यक्ति माहिती त्यांच्याकडून अद्याप आली नसल्यामुळें पुढें केव्हांतरी वाचकांस त्यांचा विशेष परिचय करून देण्याचें तूर्त आश्वासन देऊन ठेवतों.



# आख्यान—रत्नमाला—नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवि **दासगणू** महाराजांचींहि प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा —ंची किं. प्र. फी. सह ३। रु. **ग. अ. सराफ**-नांदेड ( निजामस्टेट )

2330

# सुभद्राहरण.

( कविवर्य चूडामणि-सुत विरचित. )

१ पद [ चाल-ये धांवत कृ० ]

श्री स्वामी तपोमय धामी बनला कामी      झापडी करी बलरामीं ध्रु०
गांडीवें धनुर्धर पांडव, खांडवें-दाही      यात्रेंत प्रभासीं राही
द्विजपती द्वारकेप्रति जाति हें पाही      मनिं तळमळ चैनचि नाहीं
हरि-भगिनि सुयोधन वरी, उचित हें काई ?      त्रिदंडि होय लवलाही

चाल-द्वारकेंत देवस्थानीं
' यति पहावा ' ह्मणती ज्ञानी
जी वृत्ति निरंतर ध्यानीं

जाणिली कळा यदुपतिनें रत निजकामीं      झापडी० १

द्वारांतुनि लोकिति लोक घोकिती कीर्ति      कीं शुकदेवाची मूर्ति
तो दंडकमंडलुमंडित, पंडित धूर्ती      निज अभ्यासाची स्फूर्ति
द्वारपाल हरि यदुपाल वाढवी कीर्ति      भेटिं जमुनी आली पूर्ति

चाल-हलधरहि रहित जाहला
यति-दर्शन घेऊं आला
तनुभावासहित निमाला

' उच्छिष्ट पडावें याचें अमुचें धामीं '      झापडी० २

पडे उडी पुडीला संतत हलधर-मंत्री      आधिं आधिं आपण आमंत्री
' नारायण ' मुखिं पारायण होत सुमंत्रीं      अति निपुण मनोभव-तंत्रीं
यतिराज भोजना आले, थाट वाजंत्री      भजनांत वाजवी तंत्री

चाल-हरि, अबलां मंडळि जमली
योगी-पद-वंदानिं रमली
केवळ सुभद्रा भ्रमली

चूडामणिसुत धेणी धणी पुरेना नामीं      झापडी० ३

---

१ विषय। २ गुंग। ३ धनुष्यविशेष ४ अर्जुन ५ खांडव वनाला जाळणारा. ६ स्थल विशेष ७ बलराम ८ संन्यासी ९ युक्ति १० कृष्णानें ११ आपल्या हेतूच्या ठिकाणीं १२ पाहती १३ भिक्षुकांनीं १४ पूर्णता १५ शांत झाला १६ बलरामाचा प्रधान १७ उत्तमशा मंत्रांनीं १८ मदनाच्या-कामाच्या धोरणांत १९ सारंगी २० स्त्रिया २१ इच्छा

याठिकाणीं अनायासेंच अर्जुनाची व सुभद्रेची परस्पर दृष्टादृष्ट झाल्यावर

**२ पद** ( चाल—हटातटानें पटा. )

मार[1] पहा अनिवार मार अविचार करी अवचटा[2]
फार गुंगविलें अर्जुन भेटा[3] ध्रु०
द्वार धरुनि लोंचार सुभद्रा सारसुंदरी सती
काम—संचार जाहला यति
पोरवयामधिं समोर दिसली कोरनयन हालती
मुखवटा चोरहंसे खुषमती
पदर मुखावरि, नजरहि चंचल, अधर[5] पोंवळ्यागति
वाजती कंकण खणखण हातीं
**चाल**- हरि, राम मध्यमंडळीं स्वामी बैसला
वाढलें पात्रहि न कळेचि दर्भ[6] खासला
घडिघडी खुशीनें चित्तांतचि हांसला
ध्यास लागला मनास ‘ अशी का कशी मिळेल ही नटा ? ’ फा० १
ग्रास घ्यावया उदास यति उच्छ्वास टाकि घडिघडी
मुखीं ‘ नारायण ’ वदतो गडी
भात कालवित हात चाचरे, खात घृतासह वडी
पोळिवर माखुनि ठेविलि कढी
खीर कालवित नीर घालुनी चिरिव लिंबु तांतडी
त्यावर कोथिंबिरिंची वडी
**चाल**· शिकरणामधें कुस्करिला सगळा वडा
सारांत फेणि भिजविली, पहा गांवढा
आमटींत टाकिला घीवर, साखरखडा
मनीं सुभद्रा-मुद्रा नटली, क्षुद्रा वृत्ती नटां[9] फा० २
शंकातंकित[10]-चित्त लोक, बलराम हंसे गदगदां
स्त्रिया वदती हा ‘ चेवलों[11] ’ तदा

---

१ मदन २ अकल्पित ३ योध्याला ४ दांत ५ ओंठ ६ छाटला ७ अडखळे ८ गांवढळ ९ वेषधारी १० शंकितचित्त झालेलें ११ चवला.

श्रीपति[1]. गति[2] योग्याची मतिनें सांगे यति[3]- कायदा
असावी वृत्ति विदेही सदा
इष्ट–मित्र, शुभ, दुष्ट समानाचि, रतला जो निजपदा
इंद्रियां लाड[4] देइना कदा
चाल–प्रारब्ध थोर मुनें[5] आला नगरा मुनी
शुक, वामदेव ही गोष्ट ऐकतों जुनी !
किति याचि योग्यता ? मिती करावी कुणी ?
चूडामणि–सुत, धणी[6] पहा हो ! गुणि पुरवी निज हटा[7] फा० ३

सुभद्रा ( रुक्मिणीस ):—३ पद. ( चाल-परम सुवासिक. )

वहिनी परि तुह्मि बहिणी समजुनि रहणी[8] तुमच्या मी पुरत्यें
हलधर–दादा, कौरव–नादा लागुनि कोपति हरिवरते ध्रु०
सार तरिच संसार, मिळे भर्तार[9] मनासारिखा बाई !
सगुण[10] असावा, डौल दिसावा, लोक जयाचे गुण गाई
धीर, प्रतापी बहुत, न कोपी, संतत[11] झोंपी नव जाई
धन्य दैव, मग मान्य जनांला, सफल स्त्रियांची चतुराई
दगडें[12] घासना, गोड भासना, कधिंच हांसना, बहु खाई
देत जांभई, निवळ लांबई[13], भांबरें[14]–वृत्ती अति घाई
अशा पतिसवें रती कशाची ! गतीच हरपे, मन झुरतें ! ह० १
मला कसा ग बाई ! भलों[15] सुयोधन ? खलांत गणना, मति खोटी
सुत अंधाचा, गुरु मंदाचा, धंदा चावट धरि पोटीं
मनांत वाटे तनाबरोबर[16], जनांत लज्जा तरि मोठी
दादा परि त्या भरीस पडले दुर्बळ दुबळ्या लंगोटी
काय तयाला उपाय साजणि ? दुधांत पिळितो लिंबोटी
कपाळें[17] हें, नाकपाळें[18] सांडुनि चांडाळापदरीं लोटी
कोण तया दोन गोष्टी सांगेल, जसें तयाचें मन परतें ह० २

---

१ कृष्ण २ स्थिति ३ संन्यासाचे नियम ४ कौतुक ५ ह्मणून ६ इच्छा ७ हट्टाला ८ चालचलणूक ९ पति १० गुणवान् ११ नेहमीं १२ निर्बुद्ध १३ दांघं १४ वेडसर १५ योग्य १६ तृणतुल्य १७ नशीब १८ इंद्र.

नरांमधें एक खराच महिरा, पुरा धनंजय गुणराशी
देश हिंडतो, वेष पालटुनि, लेशहि नकळे इतरांसी
बंगाल्यांतिल अबला लागट, चांगट, विलगट, पदरासी
सिंहोळ्व्यांतिल झळाळ पुतळ्या गळ्यास पडतिल चतुरासी
गाडि कृष्णाचा घडिं न विसंबे वडिलहि बसले निसुरांसी
कुठें तरि फसला, स्त्रियांत घुसला, असतां, येता नगरासी
चूडामणि–सुत, धरणि शोधवा, दूत बोधवा, मन झुरतें ह० ३

रुक्मिणी ( सुभद्रेस ):–४ पद ( ता. दादरा )

जमुनि बायका गे ! नवल आयका !
ढालगिव्या बाळपणीं, ख्यांल भरले पहाल सये ! नायका, ज० ध्रु०

चाल– सहज जाणिली म्यां चित्त-चौकशी
वडिल नेमिती तो नेम टाकिशी
गोष्टि बोलुनीयां त्वरित झांकिसी
गाय जशी जाय सहज, हट्ट काय चाटपणें ? नवल परि आयका,० १

" जनकबंधुनीं जें क्षेत्र अंकिलें
भाग्यवंत हो का फार रंकिलें
उचित कन्यकेला " ऐसें ऐकिलें
मोपें असो खोप नवी, चौकशिची थोपें बहुत, चित्त करुनि आयका,० २

हें रुक्मिणीचें भाषण न आवडून सुभद्रा तिला ह्मणते:—

प्रथम काळिंच्या बहुत साबड्यों
लिहुनि पत्रिकेला धाडिती गड्या
वदति बंधुलागीं गोष्टि वांकड्या
रातोरात आणुनि नाथ, स्वार्थ करित विठ्ठल ह्मणे, त्यांत वाक्यें सायका० ३

श्रीकृष्ण सुभद्रेचा हेतु मनांत आणून बलरामास ह्मणतो:-

---

१ सुरेख २ लोचट ३ चांगल्या ४ चिलगणाऱ्या ५ सिंहलद्वीपांतील ६ तेजस्वी ७ निष्काळजी ८ पृथ्वी ९ चेष्टा १० नेमिलें ११ दारिद्र्यानें गांजिलें १२ पुष्कळ १३ मर्यादा १४ मोळ्या १५ वाक्यरूप बाणाला.

५ पद ( ता. दीपचंदी )

दादा ! यात्रेसी चला दलभारें  गजरथसह परिवारें ध्रु०
लागलींच; केल्या सामग्री सिद्ध सुपाकीं  नाहीं उणेंचि बाकी
यादवसमुदायाहि वहनां हांकी  रज[2] सूर्या झांकी
सारी अबला मंडळी जमली  भ्रमवा दौंडी नगरद्वारें गज १
माधव, बलराम रथावरि बसले  रविचंद्राचि दिसले
स्वामी उभयतांस पाहुनि हंसले  निजमठींच बसले
कसलें हरि विंदान[3] करी तंव  यतिवर गहिंवर भरला भारें गज २
' हाटका स्वामीला मानस जाणा  जरि येतिल राणा
गाहिरा एक स्यंदन[4] पाहुनि आणा '  बसवी यदुराणा
शाहणा ऐकट मार्गी चाले  चूडामणि-सुत, रथ परभारें गज ३

अर्जुनाला रथांत बसवतांच,

६ पद ( चाल. लावणी. ता. धुमाळी )

बलराम घाबरे ' यति जातो ' चाचऱ्या[6]
रथ यास कशाला ? चणंक जसे बोचऱ्या
उगा बसून होता स्वामी मठमंदिरीं
आह्मिं आणुनि याला अपेश धरिलें शिरीं
थरथरां कांपतो लटलट उडवी * *
पंगुला लंघणें आला दुर्घट गिरी[9]
हा क्षात्रधर्म वीरासाचि, योद्ध जरी
यानें खाव्या पोळ्या, तूप, लेंडुका[10], खिरी
हाडें खुळखुळ होतिल शरिराच्या कांचऱ्या[11]  रथ० १
श्रीकृष्ण ह्मणे " स्वामी ! सांभाळुनि बसा
तुमच्याहि कपाळा[12] घोर[13] लागला कसा ?
हा अबलाजन[14] चालला यांसवें असा
मनिं बळकट ठेवा निज ज्ञानाचा ठसा
पुढें चला आह्मां उद्योग आहे फारसा "

---

१ रथ इत्यादि २ धुळ ३ चातुर्य ४ रथ ५ एकटा. ६ घाचरत चालला ७ हस्मरे ८ दांत नसणाऱ्याला ९ पर्वत १० लाडू ११ सुरकुत्या १२ नशीबाला १३ चिंता १४ स्त्रिया.

दादा[1]सी नेलें ठकवुनि, नाटकि कसा !
वदे चूडामणि—सुत, कळा[2] कुठानि गोचऱ्या[3] ? रथ० २

यापमाणें कृष्णानें अर्जुनाला युक्ति सांगतांच,

७ पद ( चाल-चंद्रकांत ग० )

रथ एकट तो झटपट आला स्त्रियांनिकट[4] यतिचा
' नारायण ' उच्चारी वरि परि ध्यास धरी सतिचा[5] ध्रु०
नारि वदति हा भारि तापसी सारि टाळि[6] ध्यानीं
अशा ऋषीला कशास आणिलें श्रमी[7] करित रानीं ?
दयाच उपजे वया पाहतां मुख गोजिरवाणी
पोरवयामधें थोर योग घेतला विरागानीं[8]
घडिघडि हंसतो, सौम्यहि दिसतो, घडिं गातो गाणीं
कृपाच हरिची पूर्ण जरी मग सुशांतहि वाणी
चाल— साउली स्त्रियांची पडूं न दे तिळभरी
मग कशीं भाषणें कानीं पडतिल तरी ?
स्वयें चोपदार दारांत वसे श्रीहरि[9]
लौकिक सोडुनि आशा मोडुनि लोभ, मोह हातिंचा ना० १
कटाक्ष-मुद्रा पाहे सुभद्रा वेष तापसाचा[10]
लक्ष दिसे प्रत्यक्ष पार्थ लक्षणी होय साचा
कृष्णाहि अमुचा सतृष्ण[11] यावरि योग प्रवासाचा
असा मनोरथ कसा पुरे मग जीव हिरा साचा
अर्जुन वर्जुन[12] सर्व मंडळी, झोंकविली; साचा
हरि-स्वसाच्या[13] रसास गुंतुनि सुलाभ परिसाचा
चाल-स्यंदनाजवळ निजस्यंदन आणिला तटा[14]
हांसला, चपल दृष्टिनें पाहे मुखवटा
गोरटी पदर सरसावी चमकुनि नटा
अलख[15] उचलली पलख[16] न लगतां स्वभाव खगपतिचा[17] ना० २

---

१ बलरामाला २ युक्ति ३ माहीत ४ वायकांजवळ ५ स्त्रीचा—सुभद्रेचा ६ समाधि ७ कष्टी ८ वैराग्यानें ९ श्रीकृष्ण १० संन्याशाचा ११ इच्छा धरून असलेला १२. सोडून १३ सुभद्रेच्या १४ कांठाशी १५ अधर १६ तेल १७ गरुडाचा.

अर्जुनानें सुभद्रेला रथांत घालून नेतांच स्त्रियांत गडबड उडाली,

अगइ ! अहा ! हें सोंग पहा संन्यासि चोरि करितो
पाहतां पाहतां चांगट[1] तरुणी बळें पोरि धरितो
धीट केवढा नीट चालिला, जणूं हिला वरितो
टाळ्या बडवित, चोळित निजकर उगे अह्मि कुरबुरितों
" जवळ नसे बलदेव पळारे उभा धरुनि चिरितो
श्रीरंगानें सोंग वाढवुनि ठेविला मार्जुरि[2] तो "
चाल–धांवती दूत सांगती हरीला कथा[3]
' यति भगिनी घेउनि पळवित गेला रथा '
हल[4], मुसल घेउनी दादा[5] मुरडी पथा
यादव पळती त्वरें धरारे ! चोर दुष्ट मतिचा ना० ३

बलराम हा सैन्यासह लागलींच युद्धाला तयार झाला, परंतु,

सन्मुख त्याच्या कोण उभा राहुनी युद्ध-कर्ता ?
दिशा दहाप्रति अहा ! धांवती ह्मणे ' आतां परता '
दुर्धर त्याचा मार, वीर अनिवार रणावर्ता[6]
दादा झाले ' चकित कोण संन्यास–वेष–धर्ता ?
भार्गव[7]-प्रतिमा समरीं[8] सीमा, कीं जानकि[9]-भर्ता ? '
कृष्ण ह्मणे, जिष्णूं[10] यात्रेप्रति फिरत अशी वार्ता
चाल–तो तरि नसेल कीं आला ? रुप झांकिलें
' भिक्षुनें नोलि पोरगी, ' नाहिं ऐकिलें
हलधरें[11] मुसळ, नांगर महिवरि[12] टाकिलें
चूडामणि–सुत–विभु–स्ववांछित योग सर्व हातिंचा ना० ४

शेवटीं कृष्णाच्यां मनांत जें होतें तेंच घडून आलें, हें पाहून,

बलराम ( कृष्णास ):—८ पद ( चाल–ददातटातनें. )

तव संमत हें सार शेवटा नेली निज बाणी
कशाचा यति ? गांडिवपाणी[13] ध्रु०

---

१ चांगली २ मस्तखोर ३ बातमी ४ नांगर ५ बलराम ६ रणनदींतील भोंवरा ७ परशरामाचा मूर्तिमंत पुतळा ८ युद्धांत ९ राम १० अर्जुन ११ बलरामानें १२ भूमीवर १३ अर्जुन.

मीच एकला कशास वाइट ? सकलांची मर्जी
तोहि गाडि दिसतो अति गर्जी
त्यांच नेमिला नेम कृष्णजी ! हरिहर नां वेर्जी
आतां जा आणा करुनि अर्जी[३]
चाल— शुभ आयुष्य वाढो फार वधू पार्थाला
'ताटांत वाटिमधें' एक आलें अर्थाला
मी एक धरूं कां कौरव—पति—स्वार्थाला ?
जातों द्वारके साहित्याला, वधुवर तूं आणीं कशा० १

बलराम द्वारकेला जाण्याकरितां निघतांच श्रीकृष्ण

निज चरणाची आण घालुनी वधुवर पाचारी
प्रार्थिला आणिक परिवारीं
नगरा आले सर्वहि, झाले कौतुक दिन चारी
परस्पर पुसति समाचारीं
चाल—" तुज कसा सुभद्रे ! अर्जुन कळला पोटीं ?
फार खोल खोल बुद्धिची शाहणी मोठी
कृष्णाची भगिनी मनिंची फारच खोटी
पारखिला सारखा तुवां वर, झालिस नर-राणी " कशा० २
वसुदेवाला योग्य वाटलें, अर्जुन जामाता
घेतसे 'अलाबला' माता
सहस्र सोळा गोळा होउनि भाग्य वानिताता
पूर्ण मानस[११] मन्मथ-ताता[१२]
चाल—नाचती नटी, मंडपांत भरला नाद
शास्त्री जे ब्राह्मण करिती अति संवाद
* * * *
चूडामणि-सुत भाट गर्जतो धड धोंगडेवाणी कशा० ३

**संपूर्ण.**

---

१ गरजू २ मोठा ३ प्रार्थना ४ ताटांत पडलें काय आणि वाटींत पडलें काय सा-रखेंच ५ दुर्योधनाचा पक्ष ६ द्वारकेला ७ अर्जुनाची स्त्री ८ जावई ९ सोळा हजार स्त्रिया १० वर्णितात ११ तृप्त १२ मदनाचा पिता श्रीकृष्ण १३ जाडीभरडी.

# नारद-माया-दर्शन.

( कविवर्य-**रुक्मांगद**-सुत-विरचित. )

**१ पद** ( चा० हटातटानें. )

एके दिवशीं **नारद**[1] मुनिवर त्रैलोक्याधिप-सदना[2]—
आला; नमुनि वदे **मधु**—कंदना[3] ध्रु०
" माया तूझी मजला दावीं सत्वर सुहास्यवदना!
ऐकुनि आलें हंसु शुभ-रदना "

नारदाची इच्छा पाहून देवानें,

आतां तुजला सुख वाटे परि अंतीं करिशिल रुदना[4]

असें ह्मणून,

बळेंच अवर्तविलें[5] कीं मदना
आग्रह त्याचा जाणुनि विभुनें[6] केलें तूर्ण[7] सरसी[8]
नाम-स्मरणें भव-भय नाशी
घनःशाम **श्रीकृष्ण** दयाघन विभु द्वारकावासी ना० १
फणसौदुंबर, आम्र, खर्जुरी[9] बकुल, मोगरा, जाई
सरस्तटिं[10] पाहुनि मोदा[11] वाही
मयूर, सारस[12], शुक पतंग-रवा[13] परिसुनि करि नवलाई
कुमुदेंदिवराच्या[14] समुदायीं
अलि[15] गुंजारव करीत उठले; एकच मराल-घाई
विधि-सुत-मानसिं[16] तोष न माई

हें सर्व निर्माण करून **श्रीकृष्ण नारदास** ह्मणतात:—

पर्वकाल तो अल्पचि उरला, ऊठ सख्या! स्नानासी ना० २

---

१ या कथाभागांतील **नारद** हे कीर्तन-परंपरेचे आद्याचार्य ' **भक्तिसूत्र** ' कार **नारद**मुनि नसून निराळेच कोणी आहेत. ( ल. रा. पांगारकर ' नारदभक्तिसूत्रें ' या पुस्तकाची प्रस्तावना पहा ) २ श्रीकृष्णाच्या घराला ३ कृष्णाला ४ रडशील ५ बोलाविलें ६ श्रीकृष्णानें ७ तात्काल ८ सरोवरास ९ खारीक १० सरोवराच्या कांठीं ११ आनंदित होऊन १२ हंस १३ पक्ष्यांच्या ध्वनीला १४ लाल आणि निळ्या कमलांच्या १५ भ्रमर १६ **नारदाच्या** मनांत.



[library stamp] 22880

वीणा तैसें कृ[1]ष्णाजिनही तीरीं ठेउनि उठला
प्र[2]भ्वाज्ञेसी निश्चित नटला
समंत्रक स्नानाविधि करितां, पुरुषत्वाचा खटला–
गेला[3]; ब्रह्मचर्य-हृदें[4] अटला
श्रीहरि–कीर्तन, संत–समागम, यांपासुनि जो सुटला
केवळ नारिजनांतचि पटला

नारदमुनि स्नानाकरितां पाण्यांत बुडी मारणार तोंच,

मान[5] तुकावुनि गमना करितो ईश्वर निजभवनासी[6] ना० ३

बुडी मारतांक्षणींच चमत्कार असा झाला, कीं. नारदाच्या ऐवजीं,

२ पद ( चाल–राधाधर मधु० )

श्यामा[7] नव यौवना जाहली श्यामा नव यौवना. ध्रु०
मृगशावाक्षी[8], सिंहकटीला[9] जन करिती वंदना सदोदित १
इंदुमुखी[10], सुस्तनी, सुंदातिहि[11] ह्मणती विधिनंदना[12] पाहुनी २

स्त्रीत्व प्राप्त होऊन नारदाची नारदी झाली, तेव्हां त्याठिकाणीं,

'तालजंघ' नृप गजाश्व पैं दल[13] सह घेउनि स्यंदना[14] येतसे ३
पाहुनि तिजला भुलला नरवर[15] तीहि तया अंगना[16] भुलली ४

उभयतांचीं मनें परस्पराशीं संलग्न होतांच तो राजा तिला—

[17]शिबिके बसवुनि ने निजसदना रुक्मांगद–सुत–मना सुखावें ५

३ पद ( चाल–हटातटानें. )

राज–मंदिरा जाउनि पूतनेसह[18], ती रमली बाळा
तोषें भोगित संपत सोहळा ध्रु०
बाळ्या, बुगड्या, मूद, राखड्या, कंठीं मोहनमाळा
बहु मान्याचि झाली भूपाळा

अशारीतीनें तेथें राजवाड्यांत सुखानें काळ कंठीत असतां,

पुत्र, पौत्रही[19] बहुत जाहले, त्यांचा जमला मेळा
बहु द्रव्यातें करिती गोळा

---

१ हरणाचें कातडें-आसन २ प्रभूच्या आज्ञेचें पालन करण्यास तत्पर झाला ३ पौरुष्य लयास गेलें ४ ब्रह्मचर्याचा डोह ५ मान्य झाला ६ आपल्या घराला ७ सुंदर ८ हरिणाक्षी ९ सिंहकटी १० चंद्राप्रमाणें मुख असलेली ११ चांगल्या दांतांची १२ नारदी १३ सैन्य १४ रथाला १५ राजा १६ स्त्री १७ रथांत १८ सैन्यासह १९ नातू.

राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करून स्त्रीसुखोपभोगांत राजा रात्रंदिवस दंग होतांच राज्यांत बेबंदशाही माजली. आपल्या सुखापुढें प्रजेच्या सुखाची किंमत राजाला वाटेनाशी झाली व याचा परिणाम असा झाला कीं, प्रजेच्या मनांत राजाविषयीं यत्किंचितहि प्रेम व निष्ठा राहिली नाहीं. अशी संधि साधून,

अन्य नृपानें शीघ्र येउनी वेढियलें नगरासी ना० १

परचक्र येतांच प्रजेची दाणादाण उडाली. 'राजा कालस्य कारणं' ह्मणून आपल्यांचें सर्व खापर लोक राजाच्या माथीं फोडूं लागले. प्रधान-सेनापतींनीं सर्व वर्तमान राजाला कळविलें; तेव्हां,

सेनापतिला आज्ञा करुनी ठोकविला तो डंका
नृपवर उडवी लोक कलंका

परंतु त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं, शेवटीं,

कर जोडुनि स्त्री पतिला विनवी क्षालिन चिंता-पंका
मम पुत्रां न्या, न धरा शंका

असें तिचें ह्मणणें ऐकून राजानें आपले एकंदर पुत्रपौत्र शत्रूंशीं लढण्याकरितां धाडून दिले; परंतु,

सुत गेले रणिं मरण पावले, तेव्हां होय अंतका
रक्षःपतिविण जेवीं लंका
तेविं दंपती विकल होउनी पडले त्या समयासी ना० २

३ ओवी.

स्वपुत्र पंचत्व पावतां रणीं अति दुःखा पावली राणी
श्रीपतिचा धांवा करुनी आळवीतसे सप्रेम

४ पद. ( चाल—माझा राम पाहिला काय ? )

अच्युत नारायण गोविंद ! लागो छंद तव नामीं ध्रु०
पति, सुत, गृह, धनिं धरिला भाँव
मृगजलवत् हें सर्वचि वार्व
भवनदी-तारक तूझें नांव
यास्तव धांव मजलागीं १
स्त्रीदेहाला पावुनि देवा
स्वप्नीं कधिं नोहे तव सेवा

---

१ लोकर २ काळजीरूप चिखलास ३ चिंता ४ राक्षसपति रावण ५ विठ्ठल ६ मरण ७ माया-लोभ ८ खोटें.

मग तो सत्संगतिचा मेवा
कोठुनि देवा ! लाभेल ? २
ऐसी [1]सकरुण तेव्हां वाणी
परिसुनि आला [2]रथांगपाणी
रुक्मांगद-सुत जोडुनि [3]पाणी
नमनीं [4]संक्ताहि झालासे ३

देव ( नारदास ):— ५ पद. ( चाल—हटातटानें. )
माझी माया विलोकिली कीं नाहीं [5]कमलजपुत्रा !

नारद ( देवास ):—
पाहुनि [6]धालों कीं सन्मित्रा ! ध्रु०

याप्रमाणें माया अवलोकन करण्याची नारदाची इच्छा तृप्त झालेली पाहून परमात्मा
स्वतःकृपेनें [7]पुन्नामसरीं [8]मज्जन करवि, [9]पवित्रा—
देउनि तोषविलें ऋषि [10]गात्रां

ही प्रभूची दीनवत्सलता जाणून कवि:—
[11]चराचरीं जो व्यापक होउनि रक्षितसे निज [12]छात्रां
[13]स्वनामरूपा देउनि [14]मात्रा
रुक्मांगद—सुत दीन वाणिनें स्तवितो प्रभु-चरणासी ना० ४

संपूर्ण.

---

१ करुणेनें युक्त २ श्रीकृष्ण ३ हात ४ निमग्न ५ नारदा ! ६ तृप्त झालों ७ सरोवर विशेष ८ स्नान ९ दर्भास १० अवयवांस-शरीरास ११ स्थावरजंगमांत १२ शिष्यांना-भक्तांना १३ आपल्या नामरूपाची १४ रसायन.

# *कान्होपात्रा.

( संतकवि-**दासगणु**-विराचित )

१ आर्या [ गीति. ]

**मं**गळवेढीं **शामा** नामें ती विश्वयोषिता होती
तदुदरिं जन्मा आली **कान्होपात्रा** न वर्णवे कीर्ति

**२ पद** [ चाल–शारदे० ]

सुकुमार, असे ती फार, ठेंगणी मूर्ति
पाहुनी वदन तें पडे रतीची भ्रांति ध्रु०
ओष्ठ ते, प्रवालापरी, कुटिल कच शिरीं, वक्रशा भ्रुकुटी
वाटतें मदन ओढून धनू करि वृष्टि १
सर्वांग, असुनि सुंदर, नेसण्या चीर, जरी जरतारी
मंडीत पाच, सोन्यानें तनु ती सारी २
कंठ तो बहुत मंजूळ, जणूं कोकीळ वसंतीं बोले
ऐकतां जिचें गान तें फणीवर डोले ३
बहु शुद्ध, तिचें गान तें, नाटकी नव्हतें वानुं कुठवर
पर्जन्य पडे गातांच मेघ मल्हार ४
करि नित्य, अभिनवहि नृत्य, यौवनें भरली
**गणुदास** वाणि वर्णितां तियेला थकली ५

**३ आर्या** [ गीति. ]

छैनी, आंबट शौकी, धनिक तियेच्या ग्रहाप्रती येती
जेवीं मधुकर-पंक्ती मधुबिंदू पाहुनी फिरे भंवतीं

एकदां एक वृद्ध गृहस्थ येऊन कान्होपात्रेस ह्मणाले:—

**४ पद** [ चाल–श्रीमंत पती० ]

स्मर-व्यथा शमविं वेल्हाळे ! मी झुरत मनीं तुजकरितां ध्रु०
श्रीमंत धनिक मी मोठा मम रमणी तूं हो आतां

---

* भ. वि. अ. ३९

१ वेश्या २ ऋतु विशेष ३ रागविशेष ४ अपूर्व ५ तारुण्यानें ६ भ्रमर ७ कामविकार.

चाल—ठेवीन दासि सेवेला
फुलबाग हवा खायाला
पालखी बसुनि जायाला
अशि छान, पर्वणी जाण आली तुज आतां
ना लोटिं परिस मी परता १

त्या वृद्धाची विषयवासना पाहून कान्होपात्रा त्यास ह्मणत्येः—

५ श्लोक [ व० ति० ]

झालास तूं जरठ; मी करुं काय तूतें
ना योग्य पर्ण गळल्यावरि कोकिलातें
आतां व्यथा तव चिता शमवील पाहे
श्रीविठ्ठला भज तुला यम हांसताहे

याप्रमाणे बोलून कान्होपात्रा धनिकांचीहि अवहेलना करूं लागली; परंतु,

## ६ ओवी.

अवमानितां धनिकांसी शामा कोपली मानसीं
' कारटे ! अवदसा कैसी आठवली ही तुजलागीं ? '

शामा ( कान्होपात्रेस ) :-७ पद. ( चाल—भल्या माणसा० )

विश्व-योषिता आपण विश्वा भोग्य, विचारा कांहिं करीं
जरठ, तरुण, द्विज, यवन, मुलें बसल्यास करिसि कां निवड तरीं ?
चाल-पाणपोइ ती जशी पथांत
तशि गणिका गे ! या जगतांत
कसें येइना तव ध्यानांत ?
जटी, तापसी यांनीं तरि, घेऊन करीं गे ! माळ, हरि—
बसुन जपावा वनांतरीं भो० १

कान्होपात्रा ( आईस ):-८ श्लोक,

शिकविं ना मज ही अनिती खरी
मुळिं न कांच जडे फुटल्यावरी
ह्मणुनियां भलत्या मज आग्रहा-
करिं न गे ! जननी ! उगली रहा

१ वृद्ध २ रस्त्यांत ३ वेश्या ४ उगी, स्तब्ध.

एक तरुण गृहस्थ ( कान्होपात्रेस ):—९ पद. ( चाल—कधिं तिला. )

वश तुवां मला व्हावें

स्मरसम[1] रुप मम अवलोकावें तरुण खचित मी तुज ठावें व० ध्रु०

तरुण तरुणिचा शोभे जोडा

विबुध रसिक मी नच गे! वेडा

व्यर्थ कुतर्का नच घ्यावें व० १

कान्होपात्रा ( तरुणास ):–१० श्लोक ( शा० वि० )

पांगारा[2] फुलला फुलें करुनियां होषांत[3] आला जरीं

पाचू, चंपक, पारिजात, तरुची पावेल का तो सरी!

आला कुकुट मत्त होउनि जरी मोरापुढें नाचण्या

पावेना परि मान जाण सहसा! चाषांपुढें तो गण्यां

एक यवन ( ( कान्होपात्रेस ):–११ पद [ चाल—श्रीमंत पतीची. ]

खाहेष हमकू गानेकी नही प्यारी! समझ तेरे तनकी ध्रु०

गावोजी! गजल, ठुमरी तुम

खुषदिलसे सुनेंगे वो हम

नहि तुझे करेंगे कुछ कम

ये देख थैली रुपयोंकी न० १

एक गुजराथी गृहस्थः–१२ पदः [ चाल—गुन्हेगारां ध० ]

तमे गावो गावो आवे गर्भा गावोजी ध्रु०

गर्भा गावो झुंबरा गावो टप्पा गावो ख्याल

बद्धा गाणा हूं सामळीने तमे आपो शाल त० १

कान्होपात्रा ( सर्वांस ):-१३ श्लोक [ शा० वि० ]

गाणें गाउनि मी न इच्छित पहा द्रव्यास तेवीं चिरा

घालावी खरसूकरांपुढति का नेऊनियां शर्करा

सामांची जगिं होय किंमत खरी गातांच तज्ज्ञापुढें

डोंबारी रिझवी करें पिटुनियां ढोलास जों माकडें

---

१ मदनासारखें २ वृक्ष विशेष ३ जोमांत ४ बगीचा ५ कोंबडा ६ पक्षी विशेष ७ पक्षी विशेष ( खंड्या ) ८ इच्छा ९ गाढव १० डुकर ११ सामवेद १२ माकडें नाचविणाऱ्या डोंबाऱ्याकडे जा! तो तुह्मांला ढोल पिटून गाणें ह्मणून दाखवील!

याप्रमाणें कान्होपात्रा चैनी लोकांना अनीतीपासून व विषयवासनेपासून परावृत्त करीत असे. एकदां वारकऱ्यांचा समुदाय मंगळवेढ्याहून पंढरपुरास जात असतां कान्होपात्रेनें पुढीलप्रमाणें भजनाचा गजर ऐकिलाः—

१४ अभंग.

रूपें सुंदर सांवळा जैसा मदनाचा पुतळा
जो कां धनिकांचा धनिक बाप वैकुंठ-नायक ध्रु०
अवघ्या कळा ज्याच्या हातीं जो का भूपांचा भूपती
तो हा चंद्रभागे तीरीं उभा आहे पंढरपुरीं
ज्याच्या प्राप्तीचें कारण दिंडी, पताका, साधन
भावें ' विठ्ठल ' बोलतां गणु ह्मणे येतो हाता १

१५ ओंवी.

वारकरी ऐसें बोलतां कान्हो धांवली तत्वतां
करूनियां नमन संतां लीनवचन बोलली

१६ पद [ चाल—माझी विनवणी हीo ]

माझी विनवणी, हीच चरणीं मला दाखवा चक्रपाणी
बाळ नंदाचा, यशोदेचा धनी जो दीनअनाथांचा
पंढरीनाथ दावा करावी त्याची काशि सेवा
तीहि हो ! सांगा, रंमारंगा मजासि भेटवा पांडुरंगा १

वारकरी ( कान्होपात्रेस ):-१७ कटिबंध [ चाल—शारदे० ]

तूं मुळीं, त्रिश्वयोषिता, विवेकाहि चित्ता, वद कोठून ?
छानछोकी तसे गुलहौसि तुझे भगवान ध्रु०
जा पुजीं, तयां तूं नित्य, साध गे ! स्वार्थ क्षणिक वैराग्या
ना देइं खुळे पोरि ! तूं मनामधिं जागा १
पाहिल्या, क्षेत्रपंढरी, भक्तिनें खरी, नाश विषयाचा—
होईल, तुला तो रुचेल मुळिं ना साचा २
चैनीस मिळे रुक्सत[1], तया क्षेत्रांत विसर मग चीर
पाळण्या विठूचें व्रतचि बहुत खडतर[2] ३

१८ आर्या [ गीति. ]

ऐकुनियां तद्वचना कान्होपात्रा मनामध्यें धाली
श्वेतांबर नेसुनियां, जरतारी चीर फेडिती झाली

१ रजा २ पांढरें पातळ.

१९ श्लोक [ व० ति० ]

टाकी उपानह तसे नग कांचनाचे
' हे नाशवंत मज योग्य न संग्रहाचे
घाला मला तुळशिची बहु शुद्ध माला
न्या हो कृपा करुनियां मज पंढरीला"

अशा स्थितीत पश्चात्तापयुक्त अंतःकरणानें तिला वाटे कीं,

२० पद [ लावणी ]

व्यर्थ गोंविलें चित्त अजवरी चैनिच्यामधें सोडुनी हरी ध्रु०

शिकुनि गान, तेविं तान
अभिमान विकत पूर्ण, घेतला करीं १
नाशवंत वपुंहि[2] सत्य
करुनि नृत्य त्या धनार्थ झिजविली खरी २
द्रव्यवान् पाहुनि मान—
केली लहान; संत-चरण चुरिले ना करीं ३

कान्होपात्रेची अशी स्थिति पाहून कुणासहि वाटेल कीं,

२१ श्लोक [ पृथ्वी. ]

कुलावरुनि होत ना जगतिं या परीक्षा खरी
उसाजवळ वाढल्या महिवरी पहा साबरी
सुरम्य नलिनी[3]-दला चिखल हाच माता, पिता
गुणज्ञ परि सेव्य जें करिति मान्य तें तत्वतां

कान्होपात्रेचें वैराग्य पाहून वारकरी तिला उपदेश करितातः—

२२ अभंग.

नको कस्तुरीचा टिळा आतां गोपीचंदन भाळा
नको म्याना, घोडा, गाडी पायीं पहा भिंवराथडी
ओली, कोरडी भाकर जाण देइल शारङ्गधर
करीं वासनेची होळी मुखीं ' विठ्ठल ' नामावलि
न दे अश्रद्धेसी जागा मानीं विष्णुमय जगा
मानीं संताचें वचन अधिक माते ! प्राणाहून

---

१ वाहणा २ तनु ३ कमल.



संग्रहालय

२३ श्लोक [ शा० वि० ]

कान्हो ती बहु शोभली परि तया श्वेतांबरा नेसुनी
वैशाखीं दिनपौर्णिमेस विलसे जैसी पहा यामिनी
वेहीं भाव तिचा, तयावरि दुजी ती कंजकन्या[3] बरी
किंवा ती उठली असेल लहरी भक्तीचिया सागरीं

२४ ओवी.

कान्हो झाली विरक्त हें कळलें जननीप्रत
तैं शामा आक्रंदत येती झाली त्या ठायां

वारकऱ्यांच्या घोळक्यांत आलेल्या मुलीस पाहून शामा संतापून ह्मणत्येः—

२५ पद [ चाल—वाहवा रे० ]

बऱ्या घातल्या गळ्यांत माळा पोरी फितवायां ध्रु०
टाळकुट्यानों ! सांगा आलां कशास या ठायां ?
फितविली, पोर भली गप्पा सांगुनियां बऱ्या० १
तुह्मी तुकडे मागत फिरतां, जिणें तुमचें वायां
वाटोळें, हो काळें तुमचें येथुनियां बऱ्या० २
एकादाशी ती निव्वळ लिहिली नाशिबीं तुमंचीया
उपवासीं, दुसऱ्यासी मारूं नका वायां बऱ्या० ३
हिजड्यासम तुह्मि नाचत फिरता टाळ्या पिटुनीयां
शंख करा, पिटा उरा वहां पंढरिराया बऱ्या० ४

कान्होपात्रा ( आईस ):— २६ श्लोक [ व० ति० ]

संतां नको दुखवुं अर्पुनि वाक्शरांतें
हे मानवां भवनदींतुनि पार नेतें
यद्दर्शनें दहन होतिल गे ? त्रिताप
हे भेटवीतिल मला विठु मायबाप

शामा ( कान्होपात्रेस ):—२७ दिंडी

नको अक्कल शिकवूस मला पोरी !
भिकाऱ्यांची या गाउं नको थोरी

---

१ रात्र २ मोर ३ सरस्वती ४ ओरडत ५ बोलावा ६ शब्दरूपी बाणांस ७ नेणारे.

संगतीनें त्यांच्या न बरें झालें
कुणाचें ही ज़गीं आजवरी बाळे !

२८ ओवी.

शामाचें ऐकतां उत्तर   संत निघाले सत्वर
लक्षूनियां पंढरपुर   भजन करीत हरीचें

२९ पद [ चाल–शारदे० ]

पाहतां असे धांवली, कान्हो ती भली, लोळुं लागली तयांच्या पायीं
" सोडिता मला कां ? योग्य तुह्मां हें नाहीं   ध्रु०
ही नव्हे साधुची रीत, आणा ध्यानांत मला समवेत चला घेऊनी
बापहो ! मुलिस घाला त्या हरिच्या चरणीं   १
जरि जाल, मला टाकून, तरी मी प्राण, साच देईन आणा हें चित्तीं "
गणुदास ह्मणे या नांव हरीची भक्ति   २

वारकरी ( कान्होपात्रेस ) :– ३० आर्या [ गीति. ]

फार बरें चाल मुली ! आह्मासंगें विठूस भेटाया
वैराग्यार्क[1] तुझा नच जावो ! अस्ताचलास टेकाया

अनीतिमार्गास लावणाऱ्या आईचा त्याग करून शेवटीं,

३१ दिंडी.

येइ कान्हो त्यांसवें पंढरीस
राउळीं तो देखिला श्रीनिवास
तिचें चित्ताहि तेथून न घे जाया
शिशू[2] आनंदे माय बघूनीयां

का० पा० देवास :-३२ पद [ रा० भैरवी ता० धुमाळी. ]

मोरे नंदजीके लाल तोरी शाम तनु बहु हरी   ध्रु०
वेद तुह्मारे ज़श, गुण गावे
ऐसे तुमको दूध पिलावे
गोकुलमो ब्रिज-नारी   १
जगत तुह्मारे लागत पय्यां
वो तुम ब्रिजमो चारत गय्या
राधा करत थटोरी   २

---

१ वैराग्यरूपी बालरवि २ मूल.

दासी भई है लछमी तुह्मारी
सबके कारण तुम गिरिधारी
करे गोरस की चोरी ३
दासगणु कहे संतन खातर
अब तुम ठाडे पंढरिभीतर
लेऊं बलय्यां तोरी ४

३३ गजल.

कदमोंके पास आरज करती मै सुननेवाला तूं शहानशाह है ध्रु०
तू खुदा तू करीम तू रहीम
खता करना माफ मेरा यहि कहना है क० १

कान्होपात्रा पंढरींतच भजनानंदांत काळ कंठीत असतां,

३४ आर्या [ गीति. ]

मागें मंगळवेढीं कान्होचा बहु तपास तो झाला
कीं ठाणेदाराचा होता तेव्हां तिच्यावरी डोळा

३५ ओवी.

त्याच्या ऐसें होतें मनीं कीं कान्हो बेदरा नेउनी
नजर[1] करावी शहालागुनी मर्जी तयाची संपादण्या

त्या हेतूनें त्यानें तिच्या स्वरूपाचें वर्णन करून खाजगी पत्र लिहून पाठविलें.

३६ पद [ चाल—शारदे. ]

भूतळीं, जाइची कळी स्वरूप तें मुळीं लाजवी रतिला
अशि सकल कला संपन्न कान्हो वेल्हाळा ध्रु०
आणिदार, जिचे ते रदनें[2], मृगीपरि[3] नयन, पाहुनी वदना
वाटेल लाज साचार रोहिणी-रमणा[4] १
बहु भव्य, जिचें तें भालें[5], अधर[6] बहु लाल, जिच्या नाकाची-
ठेवणचि हुबेहुब काय कळी चांफ्याची २
चालणें, जिचें गजगति, गान तें अति, शुद्ध, सुस्वर
तुळलिया जिच्या वर्णास उणें भांडार ३

---

१ अर्पण २ दांत ३ हरिणीप्रमाणें ४ चंद्रास ५ कपाळ ६ ओंठ,

कारकुनानें पत्र वाचून दाखवितांच,

३७ आर्या [ गीति ]

ऐकूनि सर्व वर्णन त्या रमणीचें, शहा मनीं धाला
धाला नच तो केवळ, नागासम साच डोलता झाला

बादशहानें कान्होपात्रेस आणण्याकरितां शिपायांना हुकूम दिला.

३८ लावणी.

चालले अरब, रोहिले शिपाई चातुर
चमचमती भाले, तरवारी, कटियार, ढाल, खंजिर १
बंदुकी आणिक जेजाल, कराबिन हातीं
घोड्याच्या वाजती टांपा सांडण्या, उंट धांवती २
वाऱ्यानें फडकति दाढ्या जणूं काय खडी—
सैन्याची निशाणी त्या हो ! ' जय शब्द करी गुडगुडी ३
हलकारे आणिक चपरासी धाटे बांधुन
लागले पळाया मागें पोटाची आग दारुण ४
भिमथडीं तट्टें मजबूत, बटाकि त्यावरी
मेण्यास भोई ते बारा गणु ह्मणे वानुं कुठवरी ? ५

शिपाई, चटकी वगैरे सर्व जण थेट मंगळवेढ्यास येऊन दाखल झाले. कान्होपात्रा तर पंढरपुरास आहे, आणि बादशहाच्या हुकमाप्रमाणें तिला बेदरला पाठविलें पाहिजे. ही अडचण पाहून ठाणेदार घाबरला. पण सांवरून घेण्याकरितां त्यानें मोठ्या नम्रतेनें लिहून कळविलें कीं,

पद ३९ [ ताल-दादरा. ]

लिखनेके लिये लाचार हूं मै कान्हो यहां नही
बदमाष बडी है वो हुजूर, यहांसे भाग गयी
चंद रोज लवाजमेको यहां शेक लेता हूं
मिलतेहि उसे मै बिदरको भेज देता हूं

ठाणेदाराचें पत्र पोंचल्यापासून तर

४० श्लोक [ पृथ्वी. ]

अतृप्त नृप राहिला ह्मणत ' ये न कान्हो कशी ?
करांगुलि करूनियां दिन गणीतसे मानसीं

अनंग[1]-शर झोंबला, मुळिं न नीज त्यालागुनी,
सदैव निरखी पथा बसुनि भव्य वातायनीं[2]

इकडे मंगळवेढीं, ठाणेदारानें सर्व वर्तमान शामास कळविलें. आपल्या पोरीला खुद्द बादशहाचें बोलावणें आलेलें पाहून ती लव्वाजम्यासह ठाणेदारास घेऊन पंढरपुरास येऊन दाखल झाली. शामानें कान्होपात्रेस शोधून काढलें व म्हटलें कीं,

४१ आर्या [ गीति. ]

आठवले तुज कोठुनि, हे वेडेचार[3] कारटे ! ऐसे ?
पक्वान्नानें पूरितें[4] आलेलें ताट लोटिसी कैसें ?

आतां सर्वजण आपल्याला राजाकडे घेऊन जाणार हें समजतांच ती म्हणत्येः—

४२ श्लोक [ व० ति० ]

नेऊं नकोस जननी ! मज बेदराला
मी अर्पिला मदिय देहचि विठ्ठलाला
सत्ता तयावर असे अवघी हरीची
आतां तुझी न उरली अथवा कुणाची

कान्होपात्रा संतोषानें येत नाहीं हें पाहून शामा ठाणेदारास म्हणत्येः—

पद ४३ [ चाल-हाणामारा० ]

बांधुनि मुसक्या या टवळीच्या बळेंचि घेउन चला हिला
मला कारटी ज्ञान सांगत्ये जन्मुनि माझ्या पोटाला ध्रु०
चाल—पाहुं द्या हिचा दगड तो कसा
रक्षि देउनी हिजासि भरंवसा

धोंडे, गोटे रक्षण करिती जरि मनुजाचें अवनीला
तरी नृपा नच कारण पडतें पदरिं ठेवण्या सैन्याला १

कान्होपात्रा (आईस):—४४ आर्या [ गीति. ]

नेशील बळें जरि तूं तरि मी माते ! त्यजीन मत्प्राण
यांत न पडेल अंतर मी श्रीहरिचीच वाहत्ये आण

४५ ओवी.

ठाणेदार तें ऐकून शामासी हळूंच करी भाषण
नको कोपवूं तिजलागून या समयीं वृथा गे ?

१ कामबाण. २ खिडकींत. ३ वेडेपणाच्या चेष्टा. ४ भरलेलें.

ग्रं.का.१०४ १९०९

त्यावेळीं त्यानें मोठ्या युक्तीनें बादशहास पत्र लिहिलें कीं,

४६ पद [ चाल–नृपममता० ]

शशिवंदना[1] चारुगात्रा[2] बहु मानी[3] कान्होपात्रा भूपते! ध्रु
जरि बळेंच तिजला धरुनी बेदरा देउं धाडूनी तरि पहा
ती ह्मणे, मला यापरी, 'नृपाची जरी, असे मजवरी
खरोखर प्रीत तरि येइल धांवत येथ भूपती १

असें लिहून त्याच पत्रीं विनंति केली कीं,

४७ पद [ ताल–दादरा ]

तषरीफ लाइये हुजूर कान्होके लिये
अपनेहि साथ यहांसे उस्को लेके जाइये
देखतीं हैं राह वो भी आषक हुजूर आनेकी
करना ये खता माफ, यहि आरजू बंदेकी

पत्र पोंचतांच बादशहा तातडतोच पंढरपुरास निघाला.

४८ श्लोक [ व० ति० ]

मानापमान जगतीं न गणी मदांध
वा[4] जो असे युवतिच्या करपाशिं बद्ध
लज्जा मुळी नुपजते जशि मागत्याला
ना भीति, लाज उरली तशि त्या नृपाला

पंढरपुरीं येऊन कान्होपात्रेला पाहतांच बादशहा ह्मणालाः—

४९ पद [ ताल–दादरा. ]

दिलजानि मेरे कान्हो! मुझे तूं हि है खुदा ध्रु०
दिल लगा है तुझपर मेरा मैं बनूंगा गुलाम तेरा
चलो बिदरकू मत कर देरा मै बिल्कुल हो चुका दिवाना
चलिये अभी आयू मेरे बीबी! दिल० १

५० श्लोक [ शा० वि० ]

आला तो नृप दांडगा बघुनियां कीं जेथ कान्हो उभी
झांकावें जलदें जसें सुबकशा त्या चांदणीला नभीं
ग्रीवा ती करि ठेंगणी, नृप तिला प्रेमस्वरानें वदे
'रंभोरू! बघ पंचबाणाचि तुझ्या साठीं मला ताप दे

१ चंद्रमुखी. २ कोमलांगी ३ अभिमानी ४ या. ५ अपराध ६ मान ७ मदन.

कान्होपात्रा ( नृपास ) :–'५१ आर्या [ गीति ]

पंचवदन करि निजवश जरि नृपते ! पंचबाण छळि तुजसी
अभिलाषावें कां वद बापानें आपल्याच कन्येसी ?

५२ पद [ चाल–शा०दे० ]

तूं नृपा ! आह्मां भगवान, बाप ही जाण, आमची मान ही तुझ्या हातीं
हीं प्रजालेकरें तुझीं शिकव बा ! नीति ध्रु०
आमचा कराया न्याय, पंढरीराय, तुला नृपराय, नेमिता झाला
तो तूंच शिकविसी अनीति का पोरीला ? १
सन्मार्गिं आपुली रयत, करिल जो रत, तोच नृपनाथ शोभतो महिला
या विसरूं नको तूं किमपि राजधर्माला २
नृपवरा ! गुणगंभीरा ! कृपासागरा ! सर्व रयतेचें–
आहेस विमलसें सुखद छत्र तूं साचें ३

५३ ओवी.

तें नायके जैं नृपति तैं कान्होपात्रा योजी युक्ति
' बरें येत्ये तव संगतीं दर्शन घेउन देवाचें '

' येत्यें ' हें ऐकतांच बादशहास झालेला आनंद गगनांत मावेना. त्या भरांत त्यानें तिला दर्शनास जाण्याची परवानगी दिली तेव्हां.

५४ दिंडी

येइ भूपासी पुसुनि राउळांत
उभी राहुन देवास जोडि हात
" तुझें गेलें का सत्व जगन्नाथा !
पंढरीशा ! विठला ! सांग आतां "

कान्होपात्रा ( देवास ):—

५५ पद [ ता०–दीपचंदी ]

मेरी सुनिये सुनिये सुनिये आरज नंदलाला !
मोर मुगुट पीतांबरवाला सु० ध्रु०
क्यौं भये पथ्थर तुम गिरिधारी ! छांड दया जगपाला ! सु० १
द्रौपदीजीसे जाकर प्रभुजी ! साडीपर साडी पिन्हाया सु० २
नक्रोके मूंसे शामसुन्दरजी ! तूं ने वो हाथी छुडाया सु० ३

---

१ शंकर २ प्रजा ३ तत्पर,

कान्होपात्रा ( देवास ) :- ५६ श्लोक [ शा० वि० ]

नेतां भूप मला कमीपण तुला येईल रे ! श्रीहरी !
कोल्ह्यानें लुटितां स्वभाग, नपवे मानां जगीं केसरी
भूतांनीं धरितां शशी निजशिरीं खट्वांगपाणी हरा
येई कीं लघुता मनीं उमज हें राही रमेच्या वरा !

कान्होपात्रा ( देवास ) :—

५७ अभंग.

देवा ! दामाजीच्यासाठीं तूंच घातली लंगोटी
हीन जाति चोखा महार त्याचें सारविलें घर
शुंभा वेंची जनाबाई त्या तूं वाहिल्यास डोई
तेव्हां तुझा मोठेपणा कोठें गेला नारायणा !
आतां बौद्ध कां झालासी मायबापा ! माझ्याविशीं !
कान्हो पायाची बटीक नको होऊं देवा ! हक

कान्होपात्रा ( देवास ) :—

५८ पद [ चाल—अर्जुन तरि सं० ]

अंत नको तूं पाहुंस माझा करिं वेगें तांतडी
दुर्वास येतां द्रौपदीसाठीं कशि तूं घातिली उडी ?
मीं आचरिली भक्ति तुझी का आजवरी बेगडी ?
ह्मणुनी धरिलिस पंढरिनाथा मजविशिं मनिं का अढी ! २
मोल न घेतां सांवत्याची शेतीं बांधिली जुडी
मोठेपण तें त्यजुनि वाहिल्या खांद्यावर कावडी ३
डोळे झाकूं नको मुकुंदा ! कठिण असे ही घडी
गणु ह्मणे आला बेदराहुनी भूप भिमेच्या थडीं ४

याप्रमाणें कान्होपात्रेनें करुणा भाकतांच,

५९ श्लोक-( मालिनी. )

विमल यश जयाचें वेद वाखाणितात
सुरवर पद-पद्मा आदरें वंदितात

---

१ पावत नाहीं २ आभमानाला ३ सिंह ४ चंद्र ५ शंकराला ६ कमीपणा ७ गोंवऱ्या ८ पाषाणरूप ९ तीरीं १० शुद्ध ११ चरणकमलाला.

जटि, तपि, यतिलागीं नित्य ज्याचीच आस
प्रगट तिजपुढें तो जाहला श्रीनिवास !

देव ( कान्होपात्रेस ):-६० पद-[ चाल-कधिं तिला ब० ]

नको नको धरुंस भीति
काय करिल तें बघु दे नृपति नको० ध्रु०
मत्पदिं निष्ठा[1] सबल[2] जयाची
त्यास संकटें पाहुनि पळती नको० १
श्वान[3] कसें गे धरितिल वेडे
गजछाव्याला[4] या महीवरती नको० २

६१ श्लोक—[ पृथ्वी. ]

जगत्रयिं समावला असुनि जो भिमेच्या तटीं
विटेवर उभा कटीं धरुनियां करां कीरिटी
तनू सजल श्यामशा जलदतुल्य[5] नी गोमटी
असा बघुनि, घातली दृढ तिनें गळ्याला मिठी

कान्होपात्रा ( देवास ):—६२ दिंडी.

स्थान मजला हृदयांत देइं आतां
मायबापा ! हे पंढरिच्या नाथा !
दूर करिसी तरि तुझ्या ब्रिदाला रे !
डाग निश्चित लागेल विठ्ठला ! रे !

६३ श्लोक—[ व० ति० ]

जोतीस[6] जोत हरिच्या समरूप झाली
वाटे जलांत जलगार असे विराली
दुग्धामधें मिसळल्यावरि शर्करेला
का वेगळीहि करितां मग ये कुणाला ?

देवाचें दर्शन घेऊन येण्यास कान्होपात्रेला विलंब होतांच चित्त व्यग्र होऊन,

राजा ( ठाणेदारास ):— ६४ साकी.

कान्हो नहि है चमकत बिजली जैसी वो बादलमें

---

१ भाव २ दृढ ३ कुत्रें ४ हत्तीच्या पिलाला ५ मेघाप्रमाणें ६ ज्योतींत ज्योति.

देखो उस्को बहुत हुवा है देर[1] जाके मंदरमें
खडे क्या यहां खाली[2] उसबिन मेरी जान चली

६५ आर्या [ गीति ]

येउनि हेर नृपाला राउळिंचा सर्व कथिति वृत्तांत
निज देहांत मिळविता झाला कान्होस पंढरीनाथ

राजा ( हेरांस ):— ६६ साकी.

क्या पथ्थर मे कान्हो छुपाया मेरा कलिजा दिलका
अभी बनाता उस्के टुकडे शहानूशहा बेदरका—
मै हूं ख्याल करो बिलकुल उससे तुम न डरो

६७ पद—[ चाल—शारदे० ]

राउळीं, येइ भूपती, सैन्य संगतीं, घेउनी अति, विठुस फोडाया
घाबरति पुजारी, बडव्यांसह त्या समया ध्रु०
नको फोडुं नृपा ! ईश्वरा, रमेच्या वरा, जोडितों करां, सर्वही तुजसी
तव खुदा करिम हा रहिम तसा हृषीकेशी १
ना मानी, दगड याजला, तुझा हा अल्ला, आहे बिसमिल्ला, वैर थोरांसी
करुं नको, एवढ्या मान्य करीं वचनासी २

राजा ( बडव्यांस ):—६८ श्लोक-[ व० ति० ]

ना होय देव कधिंही जगतांत धोंडा
कोंड्यास घालुनि न ये करण्यास मांडा
' हा देव ' ह्मा जरि ह्मणाल तुह्मी वचांतें
दावा तदीय शिरिंचे कॆच[3] येथ मातें

६९ ओवी.

बडवे, पुजारी तें ऐकून स्तवूं लागले रुक्मिणीरमण
ह्मणती नृपाचें समाधान केंस दावून करावें

बडवे ( देवास ):—७० पद-[ चाल—नृपममता० ]

आलास भिमेच्या काठीं तूं देवा ! भक्तासाठीं विठला ! ध्रु०
परि आह्मी पोटासाठीं पूजितों तुला जगजेठी ! विठला !
चाल-भक्तार्थ, तरि श्रीहरी ! धरावें शिरीं, कचहि लौकरी
प्रभो ! गोविंदा ! चालेल आमचा धंदा त्यामुळें

---

१ वेळ, उशीर २ व्यर्थ ३ केश.

भक्ताकरितां ह्मणून पांडुरंगानें विंदान करावयाचें मनांत आणलें.

७१ श्लोक [ व० ति० ]

तात्काळ तो कच धरी स्वशिरीं रमेश
कान्होस दावित तदा हृदयीं परेश
हें पाहतां नृपति तैं अभिमान टाकी
तो भक्तवत्सल हरी नयनीं विलोकीं

७२ साकी.

कान्हो दिसतां करी त्वरेनें गमन भूप तो तेथें
मोदक पाहुनि घ्याया जणुं शिशु रांगत रांगत जातें

७३ श्लोक [ मंदाक्रांता. ]

कान्होपात्रा वदत हरिला " सांवळ्या ! शेषशायी,
' पाही तूंतें खल नर जरी दुर्गती त्यास नाहीं '
ऐसें गेले वदुनि मुनि ते व्यास, वाल्मीकि मागें
तारीं तारीं ह्मणुनि नृप हा विठ्ठले ! पांडुरंगे ! "

७४ दिंडी.

स्पर्श होतां भूपास विठ्ठलाचा
असे पालटला दुष्ट भाव त्याचा
लोह गेलें परिसास झगडण्यातें
परी बसलें होऊन हेम तेथें

निग्रहानुग्रहसमर्थ प्रभूचें भक्तवात्सल्य पाहून कविः—

७५ पद [ चाल—नृपममता. ]

कान्होस दिली त्वां जागा निज हृदयीं रुक्मिणिरंगा ! विठ्ठला !
जी जगतें दूरी धरिली ती गणिका त्वां उद्धरिली विठ्ठला !
जेथ तो, भक्तिचा झरा, तिथें श्रीधरा ! प्रगट तूं होसी
गणु बोले तारीं मजसी विठ्ठला !

संपूर्ण.

---

१ डोळ्यानीं २ पाहीं ३ दुष्ट ४ सोनें.

# पृथ्वीराज-बंधन.

( कवि श्री. कृष्णाजी गोविंद ताह्मनकर ' भारतोद्धारमालाकर्ते ' विरचित. )

१ पद [ चाल. सांबसुराभरणा० ]

ऐक्य-भाव नांदे तेथें श्रीहिं[1] वसे मोदें[2]
कळुनि वळुनि कां असा सुजनहो ! वृथा करितसां नाश विरोधें[3] ध्रु०
स्वार्थावरि पाणी सोडुनि दुरभिमान त्यजुनी
लाभहि आवरुनि मनाला लगाम घालोनी
मधु मृदु हितवचनीं परस्पर सुखवा दिनरजनीं
सुखें सुखी, पर दुःखें दुःखी होउनि नांदा प्रेमानंदें ऐ० १

२ पद [ चाल-उद्धवा ! शांतवन० )

कलहेंच[4] आर्यबांधव हे स्वपदच्युत[5] असती झाले ध्रु०
दुरभिमान दुष्ट पिशाच्चें संचार शरीरीं केला
मत्सरें परस्पर प्रेमा विलयाला अवघा नेला
जाहले प्रवृत्त[6] स्वार्थें हे स्वयें आत्म-घाताला
चाल— गृहकलहिं परां[7] बाहोनी[8]
निजबांधव-नाश करोनी
स्वत्वही परां अर्पोनी
परदास्य स्वीकारियलें
निःसत्वचि भारत झाला उघडती न अजुनी डोळे १

मोठेपणाबद्दल पृथ्वीराज चव्हाण आणि जयचंद यांच्यामध्यें आधींच कलह सुरू झाला होता, त्यांत

३ आर्या [ गीति. ]

संयोगिता सुता ती रूपगुणालंकृता कनोजांची
झाली राक्षसविधिनें[11] अर्धांगी[12] वीर पृथ्विराजाची

---

१ लक्ष्मी–संपत्ति २ आनंदानें ३ द्वेषानें ४ भांडणानें ५ आपल्या अधिकारापासून भ्रष्ट ६ तत्पर ७ दुसऱ्यांना–शत्रूंना ८ बोलावून ९ विवाहास योग्य १० जयचंद्राची ११ विवाहाचा एक प्रकार १२ स्त्री.

### ४-५ ओव्या

पृथ्वीराज, जयचंद परस्परांचा आप्तसंबंध
सत्तेसाठीं करिती द्वंद्व शत्रु सानंद पाहती
पृथ्वीराज करी कन्याहरण जयचंद झाला कोपायमान
उभयहि करिती रणकंदन[1] संहार[2] थोर जाहला

### ६ पद [ चाल-जोडुनि कंथा सांकळियां० ]

जागोजागीं वीर धनुर्धर जयचंदासी तैं लढती
धारातीर्थी[3] प्राण अर्पुनी स्वामीला अवसर[5] देती ध्रुं०
दोहिं दळींचीं[6] शिरसाहस्रें[7] पक्वफळासम रणिं पडती
थैथै नाचति कबंध[8] कितितरी कृपाणें[9] घेउनियां हातीं १
काका, मामा, कोण कुणाचा नातें हें कुणि नोळखिती
एकें घायें पाडिति धरणीं रिपुं[10] ह्मणुनी जो ये पुढतीं २
विजयश्री ती उभी ठाकली जयमाला घेउनि हातीं
दिल्लीपतिचें[4] शौर्य देखुनी प्रसन्न झाली त्यावरती ३

### ७-८ आर्या [ गीति. ]

काशीराज[11] नरोत्तम, अल्हन नरवीर, कन्ह, नीरधर
पडले घोररणीं ते कीं सुटतां अनिलें[12] थोर नीरधर[13]
पृथ्वीराज नृपाला विजयश्री माळ घाली आनंदें
परंतु इकडे अपजय झालेला पाहून,
बंधु—द्वेषें केलें यवनांशीं सख्य थोर जयचंदें

### ९ ओवी.

रामगुरु कुलपुरोहित सरस्वतीभक्त[14] चंदभाट
हाहुली राय प्रतापवंत वीरत्रय राहिले
पुष्कळ सज्जनांनीं जयचंदाला पुढीलप्रमाणें सदुपदेश केला:—

### १० पद [ चाल—साध्य नसे मुनि० ]

कलह वृथा न करावा जाणुनि रिपु कां गृहिं घालावा ? ध्रु०

---

१ युद्ध २ नाश. ३ युद्धांत ४ पृथ्वीराजाला ५ विश्रांति संधि ६ सैन्याची ७ हजारों मस्तकें ८ धड, ( शरीर ) ९ शस्त्र १० शत्रु ११ येणेंप्रमाणें वीरविशेष १२ वायु १३ मेघ १४ कवि.

कलह जरी झाला स्वजनासीं
मसलत न करीं तूं परक्यांसीं
व्यसनीं घालुं नये आप्तांसी
कांहिं विचार करावा
स्वकरें रिपु तो सबल करावा मार्ग नसे हा बरवा १
" कौरव अमुचे बंधुच असती
आह्मांशीं जरि विरोध करिती
गंधर्व तया धरुनी नेती
हा अपमान सहावा–
निज बांधव-गण रिपु-करिं द्यावा मार्ग नसे हा बरवा २
आर्य-रिपू कुणि धांवुनि येती
**कौरव, पांडव** एकचि असती
दावीं **पार्था !** ही अनुभूती
बांधव मुक्त करावा
आजि परांचा गर्व हरावा मार्ग असे हा बरवा " ३

परंतु,

११ आर्या [ गीति. ]

वीरमदें **जयचंदें धर्मा**चा बोध मानिला नाहीं
विपरीत बुद्धि झाली; निजहस्तें वंन्हि घातला गेहीं

**जय**चंदानें पृथ्वीराजाचा सूड घेण्याचा विचार करून,

१२ ओवी.

**घोरी** पाचारिला साह्यार्थ बंधूशीं रण मांडिलें व्यर्थ
दारुण ओढवला अनर्थ **आर्या**वर्ती

यापूर्वी सहाहि वेळ **म**हंमद घोरी **दिल्ली**वर चालून आला होता; परंतु त्यावेळीं **पृ**थ्वीराज आणि **जय**चंद यांचें सख्य असून इतर सर्वहि राजांचें ऐक्य असल्यामुळें प्रत्येक वेळीं **घो**रीचाच पराभव होऊन तो धरला गेला होता; पण शरण आल्यामुळे आर्यनीतीला अनसरून **पृ**थ्वीराजानें त्याला तितक्याहि वेळां मुक्त केलें होतें; परंतु यावेळीं मात्र **जयचंद**

१ धर्मराजानें भिमार्जुनादिकांना केलेला ' वयं पचोत्तरं शतं, ' यदा तु कश्चिज्ज्ञातीनां बाह्यः प्रार्थयते कुलं न मर्षयन्ति तत्संतो बाह्येनापि प्रघर्षणं ' इ० बोध. २ चित्रसेन गंधर्वादिक ३ प्रतीति ४ अग्नि ५ महंमद घोरी.

आणि पृथ्वीराज यांचें वितुष्ट असल्यामुळें घोरीला जोर आला होता. अशा प्रसंगीं दिल्लीश्वर पृथ्वीराजहि विषयसुखांत दंग होता.

१३ आर्या [ गीति. ]

संयोगिता नवोढा[1] दिल्लीश्वर पृथ्विराजया भुलवी
खुलवी तन्मन दावुनि नाना श्रृंगारभाव त्या डुलवी

तिनें त्याला इतकें विषयांध बनवलें कीं, नेहमीं त्याला वाटे,

१४ आर्या [ गीति. ]

राज्य नको कांहीं नको दृष्टिपुढें सुंदरा[2] सदां व्हावी

मग अशा स्थितींत त्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव देण्याकरितां

स्त्रैणा[3] विषयांधा कुणि कैशी जगिं या सुनीति दावावी ?

त्या विषयांध राजाला जाणीव देणारा कुणी नसल्यामुळें,

१५ पद [ चाल—जरी कुणा श्रीमंताची. ]

शुद्ध[4] नाहिं त्या राज्याची विषयलंपटाला
स्त्रीस नम्र संतत जुळुनी सुकरें[5]—संपुटाला ध्रु०
शत्रु कोण दारावरती प्राण घ्यावयाला
मित्र कोण आहे पाठीं सिद्ध संगराला[6]
कोण फितुर लावी वन्ही नाकळे गृहाला १
घालि मोहिनी नरवीरा सुंदरा पहा ती
भ्रमवि बुद्धि हातोहातीं; प्रजा ओरडे ती
" हाय हाय ! व्हावा ऐसा नृप " ह्मणे " कशाला " ? २
थोर थोर सामतांनां[7] नाहिं मानियेलें
शत्रु थोर द्वारीं असतां सैन्य दूर केलें
विषय-वन्हि जाळीं वाटे प्रजेसह नृपाळा ३

आणि असें न होईल तरच नवल ? कारण,

१६ आर्या [ गीति. ]

यौवन[8], धन, सत्तेचा अविवेकाचा घडेल संबंध
धन-मान-क्षयं घडतो त्याला एका क्षणांत हो बंधं[9]

परंतु लक्षांत न आल्यामुळें,

---

१ तरुण २ सौंदर्य संपन्न-संयोगिता ३ स्त्रीला वश झालेल्या पुरुषास ४ भ्रांति-आठवण ५ हात ६ युद्धाला ७ मांडलिक राजांना ८ तारुण्य ९ नाश बंधन.

### १७ आर्या [ गीति. ]

रतिमन्मथ[1]सम दोघे  क्रीडाति सानंद सर्वदा भुवनीं[2]
केव्हां जलमंदिरिं ते केव्हां विहराति सुखें वनोपवनीं

इकडे प्रजेची अवस्था काय ? परचक्र आलेलें पाहून व राजा विलासांत दुंग झालेला पाहून प्रजाजन स्वसंरक्षणार्थ वाट फुटेल तिकडे निघून जाऊं लागले. हें पाहून एके दिवशीं,

### १८ दिंडी.

राज-दरबारीं मंत्रिगण[3] मिळाले
" विघ्न राज्यावरि " ह्मणति " थोर आलें
भूप-दर्शन आह्मांस कोंवि व्हावें ?
वृत्त अवघें हें त्यास कुणि कथावें ? "

मंत्रिगणः—१९ ओवी.

ओलांडुनियां चौक्या सात  वर्दी[4] लागेल कैशी आंत
सुदुर्लभा[5] भूप-भेट  स्त्री-राज्य सर्वत्र जाहलें

### २० पद [ चाल—नाहीं सुभद्रा० ]

स्त्रीलंपट तो पृथ्वीराजा धुंद[6] विषयिं झाला
कोणि कुणां न विचारी अवघा बाजारचि भरला  ध्रु०
विविध[7] रुचींचीं मांसें, मद्यें सेवी दिनरातीं
कामोद्दीपक पदार्थ तैसे, मत्त जसा हस्ती
दिनमणि-उदयास्ता[8]हि ज्या न कळे धिक्[9]. नृपविभवाला  १
गोपालाविण गोकुल तैसी, प्रजा निराधारा[10]
चोर, लुटारू फिरति चहुंकडे तैं सैरावैरा
राज-भयाविण अनर्थ दारुण राज्यीं उद्भवला  २
वित्ताभावीं[11] सेना सारी सोडुनियां गेली
सेनेवांचुनि प्रजा बिचारी निर्बल बहु झाली
गृहभेदी[12] वश होतां रिपुगण बळशाली झाला  ३
भारतधर्माचा जो केवळ सहज सिद्ध वैरी

---

१ मदन २ घरीं ३ प्रधानमंडळी ४ वर्तमान ५ मिळण्यास अतिशय कठिण ६ गुंग ७ नानाप्रकारचीं ८ सूर्यास्त ९ धिःकार १० निराश्रित ११ द्रव्य नसल्यामुळें १२ घरभेदी.

व्याघ्रासारिसा टपला होता तो महमद घोरी
सुसमय[1] ऐसा दवडिल कैसा ? नकळे भूपाला ४
काय करावें कांहीं कळेना मति आतां नचले
दुर्वृत्ताचि हें कळतां त्याची-दृष्टि खचित निवळे
कुणीं करावी सादरें[2] विनती पृथ्वीराजाला ५

२१ ओवी.

चंदभाट, हाहुलीराय चामुंडराय महाकाय
रामगुरु करी हायहाय ! ' काळ कैसा पातला !

या चौघांतून कुलपुरोहिताचा-रामगुरूचा विचार असा कीं, मंत्रिमंडळानें लेख लिहून राजाकडे पाठवावा. त्याप्रमाणें,

२२ आर्या [ गीति. ]

आग्रह पुरोहिताचा पटला चंदास, हाहुलीराया
दुर्वृत्त लेख धाडिति तो देखुनि कोपली महामाया[3]

चंदभाट हा राजाच्या खास दरबारचा स्तुतिपाठक असून स्वतः कविहि होता. याप्रसंगीं मंत्रिमंडळानें धाडलेल्या लेखाचें सार चंदभाटानें.

तूं पर गोरी रत्तियं अरुता घर गोरी तक्कियं

असें थोडक्यांत दिलें आहे. त्याचा भावार्थ असा कीं,

२३ आर्या [ गीति ]

पृथ्वीराज नरेंद्रा ! वीरेंद्रा ! मन तुझें हरी गोरी[4]
रिपु दारावरि आला; सत्ता, मत्ता, तनू हरी गोरी[5]

सदर्हू लेख संयोगितेच्या हातांत पडला. तो वाचून ती संतापली; व आपल्या दासींना ह्मणत्ये:—

२४ आर्या [ गीति. ]

मन्मथरिपु[6] हा कोणी करितो नर दुष्ट आमचा दावा[7]
चवदाव्या[8] रत्नाचा अनुभव त्या शीघ्र दासिनों ! दावा

तिच्या आज्ञेप्रमाणें सर्व दासी तावडतोब निघाल्या. इकडे

२५ ओवी.

हाहुलीराय, चंदभाट द्वारीं निरोपाची बघती वाट
असंख्य दासींचा थयथयाट अकस्मात देखिला

---

१ उत्तम संधि २ विदित ३ संयोगिता ४ स्त्री-संयोगिता ५ महमद गोरी ६ मदनाचा शत्रु ७ वैर ८ खरपूस मार.

परस्पर दृष्टादृष्ट होतांच,

२६ आर्या [ गीति. ]

मारुनि जर्जर[1] केले वीर नर द्वय, असंख्य सटव्यांनीं
सागर शुष्क[2] न झाला खटपट जरि केलि बहुत टिटव्यांनीं

या उभयतां वीरांनीं युद्ध न करण्याचें कारण असें कीं,

२७ आर्या [ गीति. ]

क्षत्रिय नरवीरांनीं अबलांना शक्ति काय दावावी ?
लावावी युक्तिबळें सोय, निजांगें सुनीति सेवावी

२८ ओवी

ऐसें विचारोन चित्तांत भव्य कवाडें घेती हातांत
प्रहार ललनांचा निवारित पाहती वाट उत्तराची

इकडे निर्धास्तपणानें

२९ आर्या [ गीति ]

सौध[3]-गवाक्ष-द्वारीं राजा राणीसमेत बैसोनी
पाहुनि मौज तयांची टाळी वाजवि समोद[4] हांसोनी

राजाचें हें कृत्य या उभयतां वीरांनींहि पाहिलें; परंतु त्यांत

३० साकी

हाहुलिराया नावडली ही भूपति-कृत निज चेष्टा
" बुद्धि नृपा विपरीताचि झाली भुलवि तया ती दुष्टा
विनाश कालाची यावरि दृष्टि पडे साची "

हाहुलीराय ( चंद्रभाटास ):—३१ पद [ चाल नाहिं सुभद्रा० ]

दिल्लीश्वर दरबारीं उरला मान न वीरांचा
स्त्री–राज्यचि हें ऐसें वाटे ताबा नारींचा ध्रु०
स्त्री-बुद्धी ही प्रलयकारिणी[5] हें नुमजे प्रभुला[6]
दशरथ दिग्गज स्त्री–बुद्धीनें परलोका गेला
स्त्रीकारण हा अपमान करी निज सामंताचा[7] १
दाविल आह्मां वाट आमचें दैव तिथें जाऊं

---

१ पीडित २ कोरडा ३ राजवाड्याच्या खिडकींतून ४ आनंदानें ५ नाश करणारी ६ राजाला ७ मांडलीक राजाचा.

दुष्ट नृपाची अपकीर्ती परि सांगातीं नेऊं
संधि साधुनी सूड घेउंया या अपमानाचा २

चंदभाट ( हाहुलीरायास ):—३२ आर्या [ गीति. ]

हां हां हाहुलिराया ! न करावा व्यर्थ कांहिं अविचार
' स्त्रैण ह्मणोनि नृपाचा त्याग करावा तुवां, ' न सुविचार

हाहु० ( चंद० ):—३३-३४ आर्या [ गीति. ]

संयोगिता नव्हे ही राज्यश्रींची[1] वियोगिता समजा !
निजवैभव पर-[2]करिं तें पाहुनि कां श्रीवियोगितास[3] मजा ?
यौवन, मदमत्ता ही, सामतांशीं ह्मणूनि ला[4]परवा
अस्ता सौभाग्य-रवी जातां कुणि मानिना विलाप[5]—रवा

चंद० ( हाहु ):—३५ दिंडी.

ब्रह्मदेवाचें लिखित कोण वारी[6] ?
पाश[7] मृत्यूचा कोण तो निवारी ?
विनाकारण भूपास दूषवावें
नांव राष्ट्राचें काय घालवावें ?

३६ आर्या [ गीति. ]

शौर्य, प्रताप दाउनि धर्म-रणीं यवन सर्व मोडावे
जोडावें यश अनुपम, संकटिं भूपा कधीं न सोडावें

हाहु० ( चंद० ):—३७ श्लोक [ कामदा. ]

शौर्य दाउनी रिपु निवारिले आजवरि असें राज्य राखिलें
मान-खंडना हेंच फल किं का ? भूप जागतो काय लौकिका ?

इतकें असुनहि तुं त्याचें स्तुतिस्तोत्र गातोस. परंतु,

३८ साकी.

स्तुति—पाठक मी नोहे चंदा ! घालिन उलथी अवनी[9]
परि यापुढतीं दुष्ट नृपाच्या मन नच घालिन अवनीं[10]
न ढळे ही वाणी उगवे प्रतीचिला[11] तरणी[12]

---

१ राज्य-श्रीचा वियोग करविणारी २ दुसऱ्याच्या हातीं ३ संपत्तीचा वियोग झालेल्यास-दरिद्र्यास ४ निष्काळजी ५ रडण्याचा ध्वनि ६ निवारण करी ७ फांसा ८ भाट ९ पृथ्वी १० संरक्षणांत ११ पश्चिमेला १२ सूर्य.

३९ आर्या [ गीति. ]

अंजन मी नृप-नेत्रीं रिपुंकरवीं गर्व हरुनि घालीन
उतरुनिया राज्ञीचे सौभाग्यचुडे, करीन मी लीनें

४० श्लोक [ पृथ्वी. ]

कृतघ्न नृप होतसे अनुपकारि हा दांडगा
असे निपट भक्षणीं बकरिला जसा लांडगा
तुह्मां न उदरंभरा स्तुतिविना दुजें ठाउकें
उगाच नृप चांगला, नमविता ह्मणोनी तुकें

चंद्र० ( हाहु० ):—४१ आर्या [ गीति. ]

राष्ट्राचा अभिमानी वीर कसा स्वाभिमान विसरेल ?
घसरेल राष्ट्र—वैभव, लोकीं अपकीर्ति थोर पसरेल

४२ ओवी.

वीर, मुत्सद्दी, ब्रह्मज्ञानी   असंख्य असती स्वाभिमानी
भारतवर्षाचा अभिमानी   आढळेना सर्वथा

जयचंद्रानें पुष्कळ सांगून पाहिलें, परंतु तिकडे लक्ष न देतां व स्वतःहि विचार न करितां अपमानाचा सूड घेण्याच्या भरीस पडून,

४३ आर्या [ गीति. ]

हाहुलिराय नराधम झाला गिझनी-पतीपदीं लीन
भूपतिकृत अवमान न साहे परि पर-पदापुढें लीन

जयचंद्र ( स्वगत ):—४४ पद [ चाल-नरजन्मा ० ]

हाहुलिराजा वीरप्रतापी वश झाला महमुदा
अह्मावरि आणिल कीं आपदा   ध्रु०
भीष्म, द्रोण, कृपासरिसे नरशार्दुल पडले रणीं
धनुर्धर उरला नाहीं कुणी
धनवंतांनीं धनकनकादिक ठेवियलें लपवुनी
रिपूचें भावी भय जाणुनी
कन्या, भगिनी, जाया सुंदर सकल सवें घेउनी
निघाले दिल्लिनगर सोडुनी

---

१ शत्रूकडून २ नम्र ३ सर्वस्वा ४ पोटभरूंना ५ महत्त्वानें ६ महमद घोरीच्या पायीं ७ संकट, आपत्ति ८ पुढचें ९ स्त्री.

वानप्रस्थाश्रमी जाहले चिरसंन्यासी कुणी
‘ पहावी ’ ह्मणती ‘ दुर्गति कुणी ’ ?
धर्मनिष्ठ जन करिति प्रार्थना ‘ अंबे ! भयहारिणी ’
रिपूंतें टाकीं संहारुनी
कोणी कांहीं उपाय करिती निज निज संरक्षणीं
नृपाची काळजि करिना कुणी !
चाल-- पृथ्विराज भूपति विषय-मदें नासला
दरबारीं स्त्रीचा कारभार गाजला
त्राता कुणि नुरला, जन अवघा त्रासला
रक्षावी काशि शौर्याभावीं गृह, दारा, संपदा
स्मरावें संकटिं हरिच्या पदा १

इकडे हाहुलीरायानें महंमद घोरीस पत्र लिहून कळविलें कीं,

[ ४५ आर्या-गीति. ]

सिंहासन दिल्लीचें गृहकलहें पूर्ण जाण पोंखरिलें
यावें ससैन्य सत्वरिं जयचंदें आपणास आदरिलें

४६ दिंडी.

नीति भूपाची भ्रष्ट असे झाली
सभट सेना सोडून नृपा गेली
वीर अवघे गृहकलह-रणीं मेले
राज्य समजा हें सुकर करीं आलें

हाहुलीरायाकडून हें वर्तमान समजलें खरें परंतु तें त्याला खरें वाटेना; त्याला शंका अशी आली कीं,

४७ आर्या [ गीति. ]

रिपु-पक्षाचा आला फितुर कसा विश्वसूं सुखें आजि
दल-बल जाणुनि अमुचें, हानि न करि काय हा पुढें ऑजीं

आणि या शंकेनें प्रेरित होऊन,

४८ दिंडी.

दिल्लिपतिचें निज वृत्त कळायातें
यवन धाडी निज चतुर जासुदातें

---

१ मर्दुमकी नसतांना २ स्त्री ३ अनायासें ४ सैन्याची शक्ति ५ युद्धांत ६ घोरी.

तावडतोब जासुदानें शोध करून येऊन सांगितलें कीं,

शब्द फितुराचा सत्य नृपा ! मानीं
नसे त्राता दिल्लीस आज कोणी

घरभेदी मिळाल्यावर भारतशत्रु महंमद घोरीला चांगलेंच फावलें; व,

४९ आर्या [ गीति. ]

कालानुंकूल्य[1] मिळतां ज्वाला द्वेषाग्निची मनीं भडके
वीर असंख्य सवें तो घेउनि दिल्लीश्वरावरी[2] धडके

५० ओवी

पृथ्वीराज धन्य धन्य ! जया राज्ञी—वचन—प्रामाण्य
प्रजा तंडती[3] अन्योन्य[4] परी न सोडी विषयांतें

मुत्सद्दीमंडळानें असहाय स्थितींत चितोडाधिपति, पृथ्वीराजाचा मेहुणा—राजा समरसिंह यांस दरबारचें सविस्तर वृत्त कळवून साह्यार्थ बोलाविलें; तेव्हां तें वर्तमान ऐकतांक्षणींच,

५१ आर्या [ गीति. ]

रावळ-कुल-मुकुटमणी चितोडपति त्वरें तदा धांवें
महमद मत्त-करीचें[5] शीर्ष[6] चुरायास सिंह धांवें[7]

५२ दिंडी.

दिल्लि नगराबाहेर सिंह आला
पृथ्वीराजानें तो न आदरीला
सात दिवसांवरि वाट पाहियेली
शुकासंगें[8] विज्ञप्ति धाडियेली

स्वराज्याच्या काळीं पोपट कबुतरें यांच्याकडून पत्रव्यवहार गुप्तपणें चालवून घेण्याची कला सर्वत्र प्रचारांत होती. स्वराज्याच्या नाशाबरोबर सर्वच युद्धकला नामशेष झाली दिलेलें पत्र घेऊन तो शुक पृथ्वीराजाकडे आला, तों

५३ आर्या [ गीति. ]

जल-मंदिरिं मन्मथसा[9] भूपति करि जल-विहार सतिसंगें
शुक एक पत्र टाकी, जाणुनि माथितार्थ तद्हृदय भंगे

संयोगितेनेंहि तें पत्र वाचून पाहिलें तोंच तिच्या मनाला एकदम धक्का बसला.

---

१ योग्य संधि पाहून २ पृथ्वीराजावर ३ भांडती ४ परस्पर ५ महंमदरूपि मस्त हत्तीचें ६ डोकें ७ खासा सुटल्याप्रमाणे आला ८ पोपटाबरोबर ९ मदनासारखा.

संयोगिता ( स्वगत ):-५४ पद [ चाल-आजि अंकुर हा० ]

कुणीं दुष्टानें साधियला गे ! दांवा ?
धाडिला लिखितसह रांवा
हें पत्र नव्हें भेद-वज्र हृदयाला
नाशील सौख्य-वल्लीला
अपशकुन पहा होति किती हे मजला
पति वाटे मज अंतरला
चाल—विधि-लिखित कळे कोणाला ?
मज काळ कठिण बहु आला !
मी शरण जाउं कवणाला ?
हे जगदंबे ! केलि तुझी म्यां सेवा
संकटीं नाथ रक्षावा

राजा समरसिंह आला आहे हें समजतांच,

५५ दिंडी.

भूप धांवे सन्मित्र आदराया
राज्ञि चतुरा अनुसरे तत्सहाया
समरसिंहा सानंद नगरिं आणि
क्षमा मागे नृप जोडुनियां पाणी

द्वारावर बलाढ्य शत्रु उभा असतां पृथ्वीराजा अत्यानंदानें मेहुण्याचा सत्कार करीत होता. स्वतःच्या शौर्याविषयीं केवढा विश्वास ! परंतु त्या सत्काराकडे समरसिंहाचें मुळींच लक्ष नाहीं. मेहुण्याची विषयलंपटता लक्षांत आणून तो त्याला म्हणतोः-

५६ पद [ चाल-काय करूं कृष्णा० ]

काय दिसे मूर्ति राया ! काय दिसे मूर्ति
विषय-सेवनें होईल कां रे ! विषयाची पूर्ति ध्रु०
क्षात्रकुलाचा धर्म नव्हे हा ये शुद्धीवरती
मोक्षदायि हें खड्ग यशस्वी घेइं झणीं हातीं १
सांडि सुखासन देह पडूं दे रण-शय्येवरती
प्रिय रामा ती येईल का रे ! तुझिया सांगातीं २

---

१ वैर २ पोपट ३ भेदरूपी वज्र ४ मुकला ५ नाशाचीं लिहिलेलें ६ पति ७ हात ८ पूर्णता-तृप्ती ९ स्त्री.

रुष्ट जाहली प्रजाहि सारी कां रे! तुजवरती?
रक्षक झाले भक्षक ह्मणुनी आली काकुळती ! ३
कारभार कां तव राज्याचा नारीचे हातीं
विषय-मदें या स्त्रीनें केली विभवाची माती ४
अजुनि तरी हे! सन्मित्रा! रे! घालविं अपकीर्ति
सिद्ध रणा हो! हे वीरेंद्रा! त्रिभुवनिं करिं कीर्ति ५

याप्रमाणें समरसिंहानें कानउघाडणी करितांच,

५७ आर्या [ गीति. ]

पश्चात्तापें थरथर कांपे तनु पृथ्विराज राजाची
विषयांधाही अंतीं स्वकृत असत्कृति नरा जरा जाची

निर्वाणीच्या प्रसंगीं पश्चात्ताप करून काय उपयोग, असें जाणून,

५८ दिंडी.

सर्वे सेना उर्वरित घेउनीयां
राव चाले रणरंगिं रिपु वधाया
ह्मणे राज्ञी, ' रण-भेरि-रव न हा कीं
नृपा वाटे बोलावि ईश नाकीं '

संयोगिता ( राजास ) ५९ दिंडी.

प्रिया! आतां समरास सुखें जावें
घोर समरीं शत्रूस निर्दळावें
विजयि व्हावें वा स्वर्ग आदरावा
येथ अथवा सुरलोकिं करिन सेवा

युद्धाची तयारी झाली असें ऐकतांच,

६० आर्या [ गीति. ]

चामुंडराय आला नृप-साह्या बंध-मुक्त होवोनी
लोहाग्राविण ज्याचा शरें, रिपु-हृदयास जाय भेदोनी

हा चामुंडराय ह्मणजे कलियुगांतील भीम अथवा हनुमंत असा धिप्पाड आणि बलशाली होता. तो येतांच युद्धाला सुरवात झाली.

---

१ संपतीची २ पराक्रम ३ त्रास देते ४ उरलेली ५ दुंदुभीचा ध्वनि ६ स्वर्गांत ७ युद्धास ८ लोखंडाच्या टोकाशिवाय ९ बाण.

5

६१ ओवी.

उभय दळें भिडली क्षणांत बाण चालले सूंसूं करित
शिरें उडती अंतरिक्षांत कंदुक-क्रीडा भासली

भारतीय युद्धासारखें हेंहि युद्ध अति भयंकर झालें. त्याप्रसंगीं चामुंडराय ( राजास ):—

६२ आर्या [ गीति. ]

शर–संधान कुणावरि करूं आधीं सांग सत्वरीं राया ?

पृथ्वीराजानें शत्रु–सैन्यावर पुनः एकवार दृष्टि फेकून ह्मटलें;

शत्रूस फितुर झाला, वधि आधीं त्याच हाहुलीराया

६३ ओवी.

देश–द्रोही नृप–द्रोही धर्म–द्रोही, आत्म–द्रोही
गांजिलीसे यांनीं महीं म्हणूनि यांस वधावें

चामुं० ( राजास ):–६४ आर्या [ गीति. ]

भारत-रिपुंवरि घोरी एक शरें वधिन भूपते ! आधीं
अरि-सैन्य पळों लागे तैं व्याधी ही हरूनि यश साधीं

अगोदर हाहुलीरायाचा वध करावा असें राजानें म्हटल्यावरून ,

६५ आर्या [ गीति. ]

भूपाग्रहें तयानें शर-घातें पाडिला फितुर धरणीं
नृप-रिपुवरि शर सोडी; परि चुकला, नाकळे प्रभू करणी !

हें शर-संधान चुकतांच चंदभाटानें राजाला म्हटलें कीं,

६६ कवित्त [ दोहरा. ]

दिन पलट्यो पलटी घडी पलटी पथ्थक बान
पीथल एहिज पारखूं, दिन पलट्यो चहुं आण

[ भावार्थ ] ६७ दिंडी.

दिवस पालटला जाण हे चव्हाणा !
घडी बिघडे रे ! सत्व नुरे जाणा

पृथ्वीराजः— कर्म माझें कीं आजि फळा आलें
बंधु माझे शत्रूंस साह्य झाले

हाय हाय ! आतां पश्चात्ताप करून काय उपयोग ? चामुंडरायाकडून अमोघ बाणानें घोरीला ठार केला असता तरच ठीक झालें असतें; माझा बाण चुकल्यामुळें तो पहा

---

१ सैन्यें २ आकाशांत ३ चेंडूचा खेळ ४ पृथ्वी ५ हाहुलीरायाला मारल्यानंतर ६ शत्रूची सेना ७ पृथ्वीवर ८ घोरीवर.

घोरी आपल्या शेलक्या नव्या दमाच्या सैन्यासह मजवरच चाल करून येत आहे. राजा पडला कीं सेना उधळून टाकण्यास विलंब लागत नाहीं, हा भारतयुद्धाचा अनुभव मी कसा विसरलों! अशा प्रकारें पृथ्वीराजा आपल्या मनांत स्वतःलाच दोष देऊं लागला. तितक्यांत

६८ ओवी.

तातारखां प्रतापवंत हल्ला करी अकस्मात
पृथ्वीराज धरिला क्षणांत हाहा:कार उडाला

मुहूर्तमात्र रणकंदन करून तातारखानें आपले हजारों सैनिक बळी देऊन पृथ्वीराजाला अकस्मात घेरलें व पकडून नेलें; त्यावेळीं

पृथ्वीराजा ( तातारखांस ):—६९ दिंडी.

ह्मणे धरिला मीं घोरि सात वेळां
नसे वधिला, तो मुक्त तदा केला
तुवां सोडुनि मज एकवार द्यावें
काय मर्दांनीं क्लैब्य[1] आदरावें ?

७० ओवी.

विनाशकाल जवळ आला ठावें असे रे! हें मजला
कां छळावें दुःखिताला सांग सांग वीरांनीं ?

तातारखां ( पृथ्वीराजास ) ७१ दिंडी.

तूंच दिससी जगिं मूर्ख एक मातें
करीं आला, रिपु सोडिसी तयातें
जरी वधिला असतास तरि कशाला ?
व्यसनिं[2] ऐशा येतास तूं नृपाला!

७२ आर्या [ गीति. ]

सन्मित्र, आप्त, बांधव, सामंत तुवां बळेंचि दूषविले
गृहकलहेंच[3] तुला रे! बंधन रिपु-करिं रणांत हें आलें

याप्रमाणें उभयतांचें भाषण होऊन तातारखानें पृथ्वीराजाला कैद करून नेलें. ही विपरीत स्थिति अवलोकन करून, निदान राजाच्या कबिल्याचें तरी संरक्षण करावें ह्मणून चंदभाट समरांतून मागें पाय घेऊन दिल्लीस गेला. इकडे समरसिंह आणि त्याचा पुत्र कल्याण हे मात्र आपल्या पथकांसह शत्रूशीं निकरानें लढतच होते, त्यांना ही पृथ्वीराज-बंधनाची वार्ताहि नव्हती.

---

१ नपुंसकत्व २ संकटांत ३ आपसांतल्या भांडणानें.

### ७३–७४ दिंडी.

समरसिंहानें घोर समर केलें रावळाचें कुल सत्य भूषवीलें
पुत्र ज्याचा कल्याण; रणिं निमाला[1] दुःख सतिचें नच वर्णवे कवीला
पृथा भार्या ती समरसिंहजीची सती ह्मणुनी सत्कीर्ति जगीं जीची
मृत्यू-वार्ता ऐकून निजपतीची सती जाया ती सिद्ध होय साची

### ७५ ओवी.

' समरसिंह ' प्रिय भर्ता[2] ' कल्याण नामा पुत्र कर्ता
' पृथ्वीराज ' जिचा भ्राता[3] ऐशी दुःखानलीं[4] पोळली

### ७६ आर्या [ गीति. ]

उभय कुलांचें गेलें वैभव करिं लेशही नसें उर
पुरले जयचंद्राचे हेतु, परी राज्य ही तया नुर

शेवटीं परिणाम असा झाला कीं,

### ७७ ओवी.

महंमद घोरी, शहाबुद्दीन कनोजही घेई स्वारी करून
जयचंदासही रणीं वधून यवन-राज्य स्थापिती

या सर्वांच्या कारणांचा विचार केला ह्मणजे असें लक्षांत येतें कीं,

### ७८ आर्या

धर्मच्युत नृप झाला ह्मणुनिच तो शत्रु-बंधनीं पडला
आमिष लोभें केसरिराज जसा पंजरींच[5] सांपडला

ऐक्यभाव हा राष्ट्र-धर्म आहे; मोठेपणाच्या मदानें एकमेकांचा मत्सर न करितां प्रेमभावानें वागणें हीच राष्ट्रनीति आहे, या धर्मनीतीपासून च्युत झाल्यामुळें स्वतःचा नाश करून घेऊन पृथ्वीराज आणि जयचंद यांनीं या आपल्या मातृभूमीला परदास्य भोगावयास लावलें ! यामुळेंच पुढें हजारों वीरपुरुषांना भारतोद्धारार्थ व आर्य संस्कृतीच्या संरक्षणार्थ रणकुंडांत आपल्या आहुति द्याव्या लागल्या ! तेव्हां हें सर्व लक्षांत घेऊन व अगोदर

### ७९ आर्या [ गीति. ]

गृहिं अपुल्या भांडावें, घ्यावें नच साह्य शत्रुचें जाणा !
जिंकिल उभयां सहजचि; दास्य तुह्मां येइं, मानसीं आणा !

असा इषारा देऊन कवि ह्मणतात:—ऐक्यभाव नांदे [ पूर्वपद ]

## संपूर्ण.

---

१ मेला २ नवरा ३ बंधु ४ शोकसमुद्रांत ५ पिंजऱ्यांत.

REFBK-0002330

धनंजय प्रेस—यांजकडेच आहे. पुस्तकाच्या सुबक छपाईचें काम सवलतीनें व त्वरित करून दिल्याबद्दल व पुढच्याहि प्रेमळ आश्वासनाबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

शेवटीं उत्तरोत्तर मालेचें पाऊल असेंच पुढें पडो अशी सर्वभूतनिवासी श्रीवासुदेवाच्या चरणी सविनय प्रार्थना करितों.

नांदेड ( निजाम स्टेट. )
कार्तिक शुद्ध ११ शके १८४५

महाराष्ट्रीयांचा नम्र,
**गणेश अनंत सराफ**
प्रकाशक.

---


लक्षांत ठेवा व जरूर

# फायदा घ्या.

## गैरसोय दूर झाली आहे.

अवश्य वाचा ! व मागणी करा ! !

## स्वतः स्वार्थ साधून परमार्थ साधा !

आह्मी शहरांत मिळणारा माल खेड्यांतील लोकांस व इतरांस स्वतःचा वेळ न जातां व शहरांमध्यें ओळख नसल्यामुळें अती पैसा खर्च न होतां स्वल्प किंमतींत खात्रीचा व चांगला **सुगंधी** ( अत्तरें, तेलें वगैरे ), **स्टेशनरी, फोटोग्राफी, फोटोएन्लार्जिंग, रबरी शिक्के, प्रिंटिंग, फळफळावळ, औषधें** असाध्य रोगांवर व कुटुंबवत्सलांस नित्योपयोगी, खात्रीचीं व शास्त्रोक्त बनविलेलीं ) वगैरे माल योग्य कमिशनवर घरीं पोहोंचता करून देतों. बाहेरगांवी रुबू एजन्ट्स् पाहिजेत.

विशेष माहितीकरितां पत्रव्यवहार करावा.

**विष्णू बी. भणगे, शिरूरकर.**
**कमिशन एजन्टस्, व ऑर्डर सप्लायर्स, पुणें** शहर

---

**मासिक ) श्री साईलीला. ( पुस्तक.**

**पृष्ठसंख्या** ४० वार्षिक वर्गणी रु. ३—६—० ट. ह. सह.

हें मासिक गेल्या चैत्र महिन्यांपासून नियमितपणें दर महिन्यास प्रसिद्ध होतें. **यांत** शिर्डीचे ( ब्रह्मीभूत ) श्री **साईबाबा** यांच्या लीलांचा व बोधामृताचा संग्रह गद्य व **पद्यरूपानें** केला जात आहे. श्री साईबाबांच्या भक्तांनीं व इतर मुमुक्षूंनीं अवश्य संग्रहीं ठेवावें.

**पत्ताः**—गोविंद रघुनाथ दाभोळकर. श्रीसाईलीला कार्यालय.
५ सेंटमार्टिनरोड **वांद्रे** ( मुंबईनजीक ) बी. बी. सी. आय. रेल्वे.


—×—

# विक्रीस तयार.

| | | |
|---|---|---|
| **श्री शिवरामस्वामीकृत.** | | रु० आ० |
| श्री बोध वासष्ठी. | [ पद्य ] | ०-२-० |
| श्री शिव प्रदोषपूजा. | ( ,, ) | ०-२-० |
| **श्री सीतारामबुवा टेंबेकृत.** | | |
| श्री वासुदेवानंदस्तोत्र | ( संस्कृत. ) | ०-१-० |
| **श्री ह. भ. प. दासगणूकृत.** | | |
| श्री भक्तलीलामृत | ( ओवीबद्ध अ. ४२ ) | १-८-० |
| श्री संतकथामृत | ( ,, ६१ ) | २-०-० |
| श्री गोदामाहात्म्य | ( ओवीबद्ध अ, ३१ ) कागदी ११; कापडी | १-८-० |
| श्री पांडुरंगस्तोत्र | ( ओवीबद्ध ) | ०-३-० |
| श्री व्यंकटेशस्तोत्र | ( ,, ) | ०-३-० |
| श्री शिष्यबोध | ( ,, ) | ०-३-० |
| श्री चक्रीभजन | ( पद्य ) | ०-३-० |
| श्री ईशावास्य भावार्थ बोधिनी | ( ओवीबद्ध ) | ०-३-० |
| **न. रा. काहळेकरकृत.** | | |
| श्री दाजीमहाराज टाकळीकर-चरित्र | ( गद्यपद्य ) | ०-३-० |
| **दे. ल. महाजनकृत.** | | |
| श्री दत्तजन्म | ( पद्य ) | ०-३-० |
| श्री दाजीमहाराज पंचपदी | [ ,, ] | ० १-० |
| श्री सिद्धारूढस्तोत्र | ( ओवीबद्ध ) | ०-३-० |
| **द. अ. सराफकृत.** | | |
| श्री तुकाराम म. येहळेगांवकर-चरित्र. | | ०-४-० |
| **बाळगणूकृत.** | | |
| श्री वासुदेवानंदस्तवनमाला | ( चरित्रासह ) | ०-५-० |
| श्री वासुदेवानंद भजनलहरी | [ अभंग ] | ०-५-० |
| श्री सातवारांचें भजन | [ ,, ] | ०-३-० |
| श्री गोदामाहात्म्य | ( ओवीबद्ध ) | ०-३-० |
| श्री दत्तस्तोत्र | ( ,, ) | ०-१-० |
| श्री येसादेवीस्तोत्र | ( श्लोक ) | ०-०-६ |
| श्री दत्तमानसपूजा | ( ओवीबद्ध ) | ०-१-० |

सूचना:—सर्वच पुस्तकें एकदम मागविणारांस ट. ख. माफ.

**पत्ता:—गणेश अनंत सराफ** मु. पो. नांदेड ( निजामस्टेट. )


हें पुस्तक ग. अ. **सराफ** यांनी **खानापूर** येथें डी. जी. **सडेकर** यांच्या **धनंजय** छा. छापविलें व **नांदेड** येथें आ. र. मा. आफीसांत प्रसिद्ध केलें.